संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. १९.०६.२०२४ | अंक नं. ०९३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020













# शेअर ट्रेडिंगमध्ये फसवणुकीचे आणखी एक 'रॅकेट' उघडकीस

### सेमिनार घेत टोळीकडून अनेकांची फसवणूक

नगर – शेअर ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून नगर मधील अनेकांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक करणारे आणखी एक रॅकेट उघडकीस आले आहे. चौघांच्या टोळीने शहरात शेअर ट्रेडिंग बाबत सेमिनार आयोजित करून अनेकांचा विश्वास संपादन केला आणि त्यांच्या कडून गुंतवणुकीच्या नावाखाली लाखो रुपये घेवून पुणे येथे सुरु केलेले कार्यालय बंद करत पोबारा केला आहे. याप्रकरणी एका गुंतवणूकदाराने मंगळवारी (दि.१८) रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून चौघांच्या टोळीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एच आर श्रीकांत, धर्मेंद्रसिंग सेगर (दोघे रा. भोपाल, मध्य प्रदेश), दिनेश योगेश भटनागर (रा. पिंपळे निलख, पुणे), साजिद शेख (रा. कोंढवा, पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत संदीप बाबुराव कोठुळे (रा. साखर कारखाना कामगार वसाहत, श्री शिवाजीनगर, राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपींनी नगर शहरात डिसेंबर २०२१ मध्ये शेअर मार्केट व फोरेक्स मार्केट बाबत सेमिनार आयोजित केले होते. या सेमिनार मध्ये फिर्यादी कोठुळे यांच्या सह शहर व जिल्ह्यातून अनेक जण सहभागी झाले होते. आरोपींनी सुरुवातीला सर्वांना शेअर ट्रेडिंग बाबत माहिती दिली.

तसेच त्यांच्या कंपनीचे एक कार्यालयही पुणे येथे सुरु करून सर्वांना त्याचा पत्ता दिला. फिर्यादी व इतरांना शेअर ट्रेडिंग बाबत माहिती देत कशाप्रकारे गुंतवणूक केल्यास अधिक नफा भेटू शकेल अशी माहिती देत सर्वांचा विश्वास संपादन केला. या चौघांवर विश्वास बसल्याने फिर्यादी कोठुळे यांनी या आरोपींना वेळोवेळी ऑनलाइन सुमारे ११ लाख २० हजार रुपये पाठविले. कोठुळे यांच्या प्रमाणेच अनेक गुंतवणूकदारांनी या टोळीला लाखो रुपये दिले. मात्र अनेक दिवस उलटूनही आरोपींकडून नफा तर सोडा गुंतवलेले पैसेही मिळाले नाहीत. अनेक गुंतवणूकदारांकडून लाखो रुपये जमा केल्यावर या टोळीने पुणे मधील कार्यालयही अचानक बंद करून पोबारा केला.

अनेक दिवस त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत गुंतवलेले पैसे परत मिळविण्यासाठी कोठुळे यांनी प्रयत्न केले. मात्र त्यांना पैसे परत मिळाले नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे कोठुळे यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात मंगळवारी (दि.१८) रात्री फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी चौघांच्या टोळी विरुद्ध भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, १२० (ब) सह महाराष्ट्र ठेवीदारांचे संरक्षण कायदा कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाटील हे करत आहेत.

### नगरमध्ये आठवडाभरात ३ गुन्हे दाखल

शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीतून अधिक नफ्याचे आमिष दाखवत आर्थिक फसवणूक केल्याचे ३ गुन्हे या आठवडाभरात नगर शहरात दाखल झाले आहे. यातील २ गुन्हे सायबर पोलिस ठाण्यात दाखल झालेले आहेत. शहरातील व्यावसायिक राजीव अनंत सहस्त्रबुध्दे (वय ५३, रा. सिध्दीविनायक सोसायटी, सावेडी) यांची १५ लाख ५५ हजारांची फसवणूक झाल्याचा गुन्हा सायबर पोलिस ठाण्यात दाखल झालेला आहे. त्या पाठोपाठ प्रकाश दत्तात्रय कुकडे (रा. शिवम विहार, शिंदे मळा, सावेडी) या सेवानिवृत्त व्यक्तीची ६६ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल आहे. त्यानंतर आता संदीप बाबुराव कोठुळे यांची ११ लाख २० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर शहराबरोबरच शेवगाव मध्येही अशाच पद्धतीने अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक झालेली असून त्या पैकी एक गुन्हा नुकताच दाखल झाला आहे. तेथे गुंतवणूकदारांनी रस्त्यावर उतरून आंदोलनही केले होते.

# नगरमध्ये दोन गटात हाणामारी, महिलांनाही शिवीगाळ, मारहाण

### १२ ते १५ जणांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल

नगर – शहरातील रामवाडी परिसरात लक्ष्मीमाता मंदिराजवळ मंगळवारी (दि.१८) रात्री १० च्या सुमारास दोन गटात हाणामारी झाली. यावेळी युवकांचे भांडण मिटविण्यास गेलेल्या दोन्ही गटातील मुली व महिलांनाही शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी दोन्ही गटांच्या महिलांनी दिलेल्या परस्पर विरोधी फिर्यादी वरून तोफखाना पोलिस ठाण्यात १२ ते १५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एका गटाच्या युवतीने दिलेल्या फिर्यादी वरून तैबुद्दिन, फरदीन, अरबाज, सोहेल यांच्या सह ३ अनोळखी इसमांवर भा.दं.वि.कलम ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी युवती ही तिच्या शेजारणी बरोबर सार्वजनिक शौचालयाकडून घरी जात असताना या आरोपींनी तिला रस्त्यात अडवून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच या परिसरात राहायचे असेल तर नीट रहा नाहीतर तुम्हाला येथून हाकलून लावू अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

तर दुसऱ्या गटाच्या महिलेने दिलेल्या फिर्यादी वरून सनी चखाले, त्याचा भाऊ विशाल चखाले, स्वप्नील ससाणे व अनोळखी ५ इसम (सर्व रा. रामवाडी) यांच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीचा मुलगा व सनी चखाले यांच्यात भांडण सुरु असताना ते मिटविण्यासाठी फिर्यादी व तिची नणंद या गेल्या असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

### बजरंग दलाचे कुणाल भंडारीसह १५ ते २० जणांवरही गुन्हा दाखल

दरम्यान रामवाडी परिसरात दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडल्या नंतर रात्री ११.५० च्या सुमारास बजरंग दलाचे शहर संयोजक कुणाल भंडारी याच्या सह १५ ते २० युवकांनी या परिसरात मोटारसायकल वर फिरत घोषणाबाजी केली. त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग पावली. तसेच शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. या जमावाने जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचेही उल्लंघन केले असल्याची फिर्याद पो.हे.कॉ. तन्वीर शेख यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार कुणाल भंडारीसह १५ ते २० जणांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तलवारीने वार करत नगरमधील ३ बेकरी कामगारांवर खुनी हल्ला

नगर – बेकरीत झोपलेल्या तिघा कामगारांवर ६ ते ७ जणांच्या जमावाने तलवारीने वार करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी (दि. १८) रात्री ११.३० च्या सुमारास सावेडी उपनगरातील वाणीनगर येथील बजरंग शाळेजवळ असलेल्या फाईव्हस्टार बेकरीत घडली.

या हल्ल्यात मोहम्मद जैद अन्सारी (वय १८, रा. बीजनोर, उत्तरप्रदेश), तसेच त्याचे सहकारी नाजीम कासार, कासीम कासार हे तिघे जण जखमी झाले आहेत. तिघेही बेकरीत झोपलेले असताना अनोळखी ६ ते ७ जणांनी लाकडी दांडके, तलवार घेऊन येत त्यांच्यावर हल्ला करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, १४३, १४७, १४८, १४९ व आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## न पाठवलेलं पत्र- प्रेरणादायी व संग्रही ठेवावं असं पुस्तक

अनेक नामवंतांनी वाचलेले, प्रेरणा घेतलेले श्री महात्रया रा यांचे हे पुस्तक कुटुंबातल्या प्रत्येकानं वाचलंच पाहिजे. मार्गदर्शनात्मक विचार देमारे लेखक श्री. महात्रया रा स्वतः यात म्हणतात,

माझ्या प्रिय वाचकांनो, कोणतंही पान उघडा, एक उत्तर शोधकाला शोधत असेल. हे पुस्तक मी तुम्हाला अर्पण करीत आहे. तुम्ही जे प्रश्न विचारलेत, त्यांचीच ही उत्तरं माझ्यामधून उलगडत गेली. त्या अर्थानं तुम्ही ह्या पुस्तकाचे सहलेखक आहात.

ह्या पुस्तकात तुम्हाला जे समस्या परिहार सापडतील, ते तुम्हाला मानवी चैतन्याच्या प्रचंड नि अमर्याद असा सुप्त क्षमता सत्यात उतरवण्यासाठी समर्थ




बनवतील.

तुमच्यातले जे कोणी तुमच्या कोणत्याही कार्यक्षेत्रात- अध्यात्मिक, भावनिक किंवा भौतिक-विपुलतेची आकांक्षा बाळगत असतील, त्यांच्यासाठी हे पुस्तक आहे.

ह्या पुस्तकामुळे तुम्हाला 'अधिकतम आणि अधिकतर' जीवन जगण्यासाठी लक्षणीय साक्षात्कार होतील. लक्षात ठेवा- यश मोठ्या गोष्टीत असतं. समाधान छोट्या गोष्टींत असतं. ध्यान शून्यात असतं. ईश्वर सर्व गोष्टींत असतो आणि हेच ते खरे जीवन असते.



# रस्ते दुरुस्ती करण्यासाठी बाजारपेठेत सह्यांची मोहीम

### दुरावस्थेबाबत उपाययोजना करा अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन : शिवसेनेचे मनपा आयुक्तांना निवेदन

नगर - कापड बाजार ते सर्जेपुरा रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेबाबत शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने परिसरातील नागरिकांची सह्यांची मोहिम राबवून मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी शहरप्रमुख संभाजी कदम, युवा सेना सहसचिव विक्रम राठोड, संजय शेंडगे, बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, अमोल येवले, विजय पठारे, संतोष गेनप्पा, हर्षवर्धन कोतकर, रवी वाकळे, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, परेश लोखंडे, गौरव ढोणे, सुरेश तिवारी, अशोक दहिफळे, संदिप दातरंगे, दिपक भोसले, शाम कोके, अरुण झेंडे, मुन्ना भिंगारदिवे, अण्णा घोलप, बंटी खैरे, संतोष डमाळे, डॉ.श्रीकांत चेमटे, अभिजित अष्टेकर आदी उपस्थित होते.



कापड बाजार ते सर्जेपुरा रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेबाबत शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने परिसरातील नागरिकांची सह्यांची मोहिम राबवून मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, नगर शहराच्या मध्यवर्ती भागतील कापड बाजार ते सर्जेपुरा ते लालटाकी या रस्त्याची सध्या प्रचंड दुरावस्था झाली आहे. अनेक छोट-मोठे अपघात या ठिकाणी होत आहे. नगरच्या बाजारपेठेत जिल्ह्याच्या काना कोपऱ्यातून नागरिक खरेदीसाठी येत असतात. तरी या रस्त्याच्या दुरावस्थेकडे मनपा दुर्लक्ष करत आहे. मनपाला वेळोवेळी निवेदने देऊनसुद्धा काही उपयोग झाला नाही. तरी या रस्त्याचे काम तातडीने सुरु करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

याप्रसंगी संभाजी कदम म्हणाले, जिल्ह्याची बाजारपेठ म्हणून कापड बाजार ओळखला जातो. या भागातील दुकानदार, व्यापारी, रहिवासी मोठ्या प्रमाणात मनपाचा कर भरत आहेत. परंतु मनपा येथील समस्यांकडे दुर्लक्ष करत आहे. कापड बाजार ते सर्जेपुरा ते लालटाकी रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. याबाबत वेळोवेळी शिवसेनेने पाठपुरावा केला परंतु कोणतीही कार्यवाही होत नाही. आता नागरिक व व्यापारी रस्त्यांवर उतरुन सह्यांची मोहिम हाती घेऊन या विरोधात शिवसेनेच्या माध्यमातून आवाज उठविला आहे. या उपरही जर मनपाने काही उपाय योजना केल्या नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन केले जाईल, असे सांगितले.



विविध मागण्यांसंदर्भात 'बंद' ची हाक देताना अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा संघटना संयुक्त फेडरेशनचे पदाधिकारी.

# शहरातील ऑटो, टेम्पो रिक्षा विद्यार्थी वाहतूक १९ जून रोजीच्या मध्यरात्रीपासून राहणार बंद

नगर - अहमदनगर शहरातील ऑटो रिक्षा, विद्यार्थी वाहतूक, तीन व चारचाकी रिक्षा टेम्पो वाहतूक या सर्व सेवा १९ जून रोजी रात्री १२ वा.पासून ते २० जून रात्री १२ वा.पर्यंत संपूर्णपणे बंद राहणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी दिली आहे.

विविध मागण्यांसंदर्भात अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा संघटना संयुक्त फेडरेशने हा 'बंद'चा निर्णय घेतला आहे. रिक्षा चालकांनी विविध प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील परवानाधारक ऑटो रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करावे, परवानाधारक ऑटो रिक्षा फिटनेस लेट फी ५० रुपये रोज दंड स्वरूपात घेतली जाते, ती रद्द करावी, अहमदनगर आरटीओ कार्यालयात होणारी ऑटो रिक्षा चालकांची आर्थिक लूट थांबवावी अशा विविध मागण्यांसाठी 'बंद आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्यावतीने देण्यात आली. त्याचबरोबर २० जून रोजी सकाळी १० वाजता शहरात मोर्चाचे आयोजनही करण्यात आले आहे.

### नागरिक व पालकांनी पर्यायी व्यवस्था करावी

ऑटो रिक्षाचालकांच्या बंदमुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांचीही मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालकवर्ग तसेच नागरिकांनी पर्यायी व्यवस्था करावी, जेणेकरुन त्यांची गैरसोय टाळता येवू शकेल, असे आवाहन अविनाश घुले यांनी केले आहे.

# मिनी बँकेचे सेंटर फोडून ६० हजार रुपयांची रोकड पळविली

### चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाला कैद, पोलिसांकडून शोध सुरु

नगर - युनियन बँकेचे मिनी बँक सेंटर असलेल्या गाळ्यातील आतील काचेच्या दरवाजाचे लॉक तोडून अज्ञात चोरट्याने गाळ्यातील ड्रॉवर मध्ये ठेवलेली ६० हजारांची रोकड चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील रुईछत्तीशी गावात भरदिवसा घडली आहे.

याबाबत मिनी बँक सेंटर चालक अजय गोरखनाथ शेंडगे (रा. मठ पिंपरी, ता. नगर) यांनी मंगळवारी (दि.१८) सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे रुईछत्तीशी गावात एका गाळ्यात युनियन बँकेचे मिनी बँक सेंटर चालवतात. त्या द्वारे ते बँकेच्या खातेदारांचे पैशांचे व्यवहार करत असतात. रविवारी (दि.१६) दुपारी १२.३० ते ३.२० या कालावधीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या सेंटर मधील आतील काचेच्या दरवाजाचे लॉक तोडून आणि आतमधील टेबलच्या ड्रॉवरचे लॉक तोडून त्यात ठेवलेली ६० हजारांची रोकड चोरून नेली.

चोरीची ही घटना निदर्शनास आल्यावर त्यांनी नगर तालुका पोलिसांना याबाबत माहिती दिली. तसेच गाळ्यातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यात एक चोरटा चोरी करताना दिसून आला. मात्र सदर फुटेज अस्पष्ट असल्याने त्या गाळ्याच्या आजूबाजूला असलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी पोलिसांनी सुरु केली आहे.

या प्रकरणी अजय शेंडगे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# नगर शहरात पतीने चाकूने वार करत केला पत्नीचा खून

### सिद्धार्थनगर परिसरातील घटना; खुनानंतर आरोपी झाला पसार

नगर - पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने तिचा चाकू व हत्याराने वार करून खून केल्याची घटना सिध्दार्थनगर-मध्ये घडली. रेवती ऊर्फ राणी संदीप सोनवणे (वय ३५) असे मयत महिलेचे नाव आहे. तिचा पती संदीप ऊर्फ कुंदन राधाजी सोनवणे याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत रेवतीचे वडील बाळु केशव साठे (वय ६६, रा. बुऱ्हाणनगर, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. संदीप व रेवती यांच्या विवाहाला १८ वर्ष पूर्व झाली असून त्यांना दोन मुली आहेत. दरम्यान संदीप नेहमी रेवतीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करत होता. रेवती याबाबतची तक्रार वडिलांकडे करायची व ते तिला माहेरी घेऊन येत होते. ६ जून रोजी रात्री संदीपने रेवतीसह त्याच्या दोन्ही मुलींना मारहाण करून भर पावसात घराबाहेर काढून दिले होते.

त्या तिघी नातेवाईक वैरागर यांच्याकडे गेल्या. तेथून त्यांनी वडील बाळू साठे यांना माहिती दिली. साठे यांनी तिघींना एमआयडीसीतील त्यांच्या मेव्हणीकडे ठेवले. तेथे त्या दोन ते तीन दिवस राहिल्या. नंतर साठे यांनी त्यांना घरी बुर्हाणनगर येथे आणले. त्यानंतर संदीप सासरी बुर्हाणनगरला आला व तेथेच राहू लागला. त्याने मारहाण केल्याची चूक कबूल करून पुन्हा असे करणार नाही, त्यांना माझ्यासोबत पाठवा अशी विनवणी केली. साठे यांनी देखील त्याला समज दिली.

दरम्यान सोमवारी (दि.१७) सकाळी साडेआठ वाजता संदीप याने सासरे साठे यांची दुचाकी घेतली व तो पत्नी रेवतीसोबत घरी सिध्दार्थनगर येथे आला. दुसर्या दिवशी मंगळवारी (दि.१८) दुपारी १२ वाजाता मुलीला भेटण्यासाठी व दुचाकी आणण्यासाठी साठे मुलीच्या घरी आले असता त्यांना मुलगी रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. तेथे दांडी नसलेला चाकू होता. साठे यांनी नातेवाईक व तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रेवतीला रूग्णालयात नेले. परंतु उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी संदीप सोनवणे विरोधात भादंवि कलम ३०२ प्रमाणे खूनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# राज्य सरकारकडून 'ओबीसी समाजा'वर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही

### संजय गाते यांचे प्रतिपादन; जालना येथील आमरण उपोषणास नगर जिल्हा ओबीसी व्हिजेएनटी जन मोर्चाचा पाठिंबा

नगर - गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात ओबीसी समाजामध्ये भीतीचे व संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये असा समज जातो की ओबीसींच्या आरक्षणामध्ये कोणाचे तरी अतिक्रमण होते का? हे अतिक्रमण होऊ नये. ओबीसी समाजाला कुठेतरी शाश्वती मिळावी. यासाठी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे आमरण उपोषण करीत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांनी वारंवार सांगितले आहे की, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का न लावता राज्यातील मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरी विषयक आरक्षण देऊ आणि ते दिले पण. परंतु सगे सोयरे यांचा अध्यादेश काढून ओबीसी समाजावर अन्याय होताना दिसतोय. तो अन्याय भाजपा ओबीसी मोर्चा कदापि सहन करणार नाही. निश्चित ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही. हा विश्वास आमच्या नेत्यांबद्दल वाटतो. प्रा. हाके व वाघमारे यांच्या भावना जाणून घेऊन भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या माध्यमातून सरकारपर्यंत पोहोचवण्यात येतील. सरकार निश्चितच ओबीसींच्या बाबतीत न्याय करेल, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी केले आहे.



अंबड येथील ओबीसी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मोर्चाच्या वतीने आरक्षण बचाव आमरण उपोषणाच्या आंदोलनाला नगरचे ओबीसी व्हिजेएनटी जनमोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी आंदोलनाला पाठिंब्याचे पत्र दिले.

जालना, अंबड तालुक्यातील वडगोद्री या ठिकाणी प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे ओबीसी भटक्या विमुक्त मोर्चाच्या वतीने आरक्षण बचाव आमरण उपोषणास पाचवा दिवस आहे. यावेळी संजय गाते यांनी आंदोलकांची भेट घेतली. तसेच अहिल्यानगरचे ओबीसी व्हिजेएनटी जनमोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी आंदोलनाला पाठिंब्याचे पत्र दिले. याप्रसंगी बारा बलुतेदार महासंघाचे माऊली गायकवाड, भगवान महासंघाचे जिल्हाध्यक्ष, रमेश सानप, गोरक्ष गावडे, विनोद पुंड, निलेश चिपाडे, रोहित पठारे, मनोज भुजबळ, जामखेड जायभायवाडीचे सरपंच सुभाष जायभाय, उपसरपंच भास्कर जायभाय, माजी सरपंच श्रीराम जायभाय, रामदास जायभाय, राजेंद्र जाधवर आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, ओबीसी आरक्षणाला कुठलाही धक्का लागु नये. यासाठी नगरमध्ये महाएल्गार मेळाव्याला प्रा.लक्ष्मण हाके यांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले होते. ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी नगर जिल्हा ओबीसी व्हिजेएनटी जनमोर्चाच्या वतीने पाठिंबाचे पत्र देण्यात आले आहे.

## नितीन हुलगुंडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चुंभळी जवळारोड (ता.जामखेड) येथील रहिवासी नितीन आप्पा हुलगुंडे (वय ४५) यांचे १८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. गावच्या स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

## सौ. अरुणाबाई सांगळे यांचे निधन

नगर - तपोवन रोड, सुर्यनगर येथील रहिवाशी सौ.अरुणाबाई त्रिंबक सांगळे (वय ६७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



अरुणाबाई सांगळे यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, पुतणे, सुना,नातवंडे असा परिवार आहे. अत्यंत शांत व मनमिळाऊ स्वभावाच्या तसेच धार्मिक वृत्तीच्या होत्या.

शनिवारी अचानक त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारार्थ खासगी रुग्णालयात दाखल केले होते, त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


# वेश्याव्यवसाय सुरु असलेल्या हॉटेलवर पोलिसांकडून 'छापा'

### ३ पिडीत महिलांची सुटका; हॉटेल मालकावर गुन्हा दाखल

नगर - पोलिस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने श्रीगोंदा तालुक्यातील बनपिंप्री येथे वेश्याव्यवसाय सुरु असलेल्या हॉटेल सुप्रीम येथे छापा टाकून पीडित तीन महिलांची सुटका केली आहे. तर हॉटेल चालक किरण रावसाहेब जरे (वय ३९, रा. वारुळाचा मारुती, नालेगाव, अहमदनगर) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बनपिंप्री येथील हॉटेल सुप्रीम येथे वेश्या व्यवसाय चालू असल्याबाबत गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या अनुषंगाने या कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पो.हे.कॉ. समीर सय्यद, महिला पो.हे.कॉ. ए. आर. काळे, महिला पो.कॉ .छाया रांधवन, चालक पो.कॉ.काळे यांनी दोन पंचांसह बनपिंप्री येथील हॉटेल सुप्रीम येथे रविवारी (दि.१६) पहाटे अचानक छापा टाकला. तेथे संशयित किरण रावसाहेब जरे हा स्वतः च्या फायद्याकरिता कुंटनखाना चालवताना मिळून आला आहे. तसेच त्याचेकडून एकूण ४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर छाप्यामध्ये तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. जरे याच्यावर श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

याच पथकाने मागील आठवड्यातही बेलवंडी पोलिस स्टेशन हद्दीत नगर पुणे रोडवर गव्हाणवाडी येथील हॉटेल प्रतिक वर छापा टाकून एका महिलेची सुटका केली होती. हॉटेल मालक पप्पू राक्षे याच्या कडून १० हजारांचा मुद्देमाल जप्त करून त्याच्या सह एका महिलेवर गुन्हा दाखल केला होता. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पो.नि.नंदकुमार दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या कारवाया करण्यात आल्या आहेत.



कल्याण-ठाणे येथील ज्ञानरचना सोशल फौंडेशनच्यावतीने अहिल्यादेवी नगरचे उद्योजक राजू निमसे यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करताना गोवा विधानसभेचे सभापती डॉ. रमेश तवडकर. समवेत इतर प्रमुख पाहुणे.

# राजू निमसे यांना 'उद्योगरत्न' पुरस्कार प्रदान

नगर - कल्याण-ठाणे येथील ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनच्यावतीने अहिल्यादेवीनगरमधील उद्योजक राजू निमसे यांना उद्योग रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप आकर्षक सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह आणि मानाचा फेटा असे आहे.

गोवा विधानसभेचे सभापती डॉ.रमेश तवडकर, बुंदेलखंड येथील पद्मश्री उमाशंकर पांडे, सचिन कोरडे यांच्या हस्ते गोव्यामधील पणजी येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मराठी सिनेअभिनेत्री आशु सुरपुर, संस्थेचे संचालक प्रविण साळवे उपस्थित होते.

राजू निमसे यांनी अहिल्यादेवीनगर या महानगरासह जिल्ह्यात सर्वदूर सोलर व्यवसाय क्षेत्रात गेल्या १० वर्षांमध्ये सोलरची अधिकाधिक विक्री करून उत्कृष्ट सर्व्हिस दिल्यामुळे ज्ञानरचना सोशल फाऊंडेशनने यावर्षीच्या उद्योग रत्न पुरस्कारासाठी राजू निमसे यांची निवड केली.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात ओठांची काळजी

हिवाळा म्हटलं की, लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच ओठांची समस्या निर्माण होते. ओठ शुष्क होतात आणि त्यावरील त्वचा निघते. त्यातच लहान बाळांचे ओठ हे प्रचंड नाजूक असतात. त्यामुळे त्यांच्या ओठांवर थंडीचा लवकर परिणाम होतो. त्यामुळे त्यांच्या ओठांना रोज घरी तयार केलेलं तूप किंवा दुधावरील साय लावावी.

## पाककला

### गुळपापडी

**साहित्य** – कणीक जाडसर एक कप, गूळ किसून पाव कप, तूप तीन टेबलस्पून, वेलदोडे पूड अर्धा चमचा.

**कृती** – कढईत तुपावर मंद विस्तवावर कणीक भाजून त्यात गूळ व वेलदोड्यांची पूड घालून मिश्रण चांगले कालवावे. ताटाला तूप लावून त्यावर मिश्रण पसरावे. गरम असतानाच वड्या कापाव्या.

## वास्तू

### दिवाणखान्यातील बैठक

✻ दिवाणखान्यात घड्याळाचे तोंड शक्यतो पूर्वेकडे असावे. दिवाणखान्याच्या भिंतींना काळा वा गडद लाल रंग देऊ नये. दिवाणखान्यातील भारतीय बैठक पूर्वेला किंवा उत्तरेला असावी.

✻ वास्तूच्या कोणत्याही भागात अथवा दिशेत आलेला कट्स हा अनिष्ट असतो व तो वास्तुदोष निर्माण करणारा असतो.

✻ प्रत्येक दिशेतील कट्स वास्तुदोष निर्माण करणारा असतो तसेच प्रत्येक दिशेतील कट्स हे विविध प्रकारचे दुष्परिणाम घडवून आणण्यास कारणीभूत ठरत असतात.

## सल्ला

✻ मसाले टिकवण्यासाठी मसाल्यात तमालपत्राची २–३ पाने किंवा एखादे पान जरी ठेवले तरी ते खराब होत नाहीत.

✻ केक मऊ होण्यासाठी केकच्या मिश्रणात एक चमचा ग्लिसरीन मिसळावे.

## सौंदर्य

✻ जर ओठ फुटले असतील तर तुपात थोडे मीठ मिसळून ओठांना लावा. ओठांचे फुटणे बंद होईल.

✻ पायाच्या टाचेस भेगा पडल्यास तेल व हळद एकत्र करून लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**गुरुवार, दि. २० जून २०२४**

दक्षिणायनारंभ, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, अनुराधा १८।१०

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : कला–क्षेत्रात एखादे महत्वपूर्ण यश मिळेल. आर्थिक प्रश्नांचे निराकरण होईल. कोणतेही कार्य घाईगर्दीत करणे टाळा. वाद टाळा. नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे.

**वृषभ** : शिक्षण संबंधी विषयांमध्ये काळ अनुकूल ठरेल. कोणतेही आवेदन देण्यासाठी उत्तम वेळ. कामात अडचणी येतील. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मिथुन** : मित्रांचा पाठिंबा राहील. महत्वपूर्ण वार्ता मिळाल्याने मन प्रसन्न राहील. आपली चूक स्वीकारावी लागेल. आत्मविश्वास वाढेल. मित्रांचा सहयोग मिळेल. शुभवार्ता देखील मिळतील.

**कर्क** : नोकरीपेशा व्यक्तींना पाठबळ मिळेल. आरोग्य उत्तम राहील. अपत्य आणि इतर विषयांपासून आनंद प्राप्ति होईल. मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील.

**सिंह** : व्यापारातील प्रतिस्पर्धेत वातावरण अनुकूल राहील. प्रेमप्रकरणात दोघांसाठी आजचा दिवस चांगला आहे. व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील. मित्रांची मदत मिळेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील.

**कन्या** : आरोग्य उत्तम राहील. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील. देवाण घेवाणीत त्रास. आपला निष्काळजी दृष्टीकोन आज चांगला ठरणार नाही. घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल.

**तूळ** : आज रात्री आपल्या करीयरशी संबंधित सर्व बाबी स्पष्ट होतील. व्यापार व्यवसायात अनुकूल वातावरण राहील. आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. शत्रू प्रभावहीन ठरतील. अपत्य आणि इतर विषयांपासून आनंद प्राप्ति होईल.

**वृश्चिक** : अनिश्चिततेचे वातावरण. निराशा वाढेल. कोणतेच काम सुरळीत होणार नाही. प्रलोभनांना भुलू नका. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**धनु** : जास्त सहयोग मिळेल. कार्यकुशलतेचा लाभ मिळेल. पारिवारिक लाभ घ्या. नोकरीत विशेष सावधगिरी बाळगा. अधिक श्रम करावे लागतील. व्यापार–व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल. शत्रू पक्षापासून सावध राहा.

**मकर** : आरोग्य उत्तम राहील. व्यवहारिक दक्षता वाढवा. सामान्य सहयोग मिळेल. मानसिकतेवर लक्ष्य द्या. सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही. एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल.


**कुंभ** : नियोजित कामात अडचणी येण्याची शक्यता. कामावर प्रभाव पडेल. अचानक खर्च वाढेल. शत्रू प्रभावहीन पडतील. आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे वादाला कारण ठरू शकते.

**मीन** : आर्थिक नुकसान संभव. मानसिक संतोष वाढेल. कामात अडचणी येतील. शत्रुपक्षाच्या कारवाया वाढतील. आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९४९

सौ.शैलजा कुलकर्णी




**शब्दगंध क्र. ६९४८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | रं | प | रा | ग | त | ■ | अं |
| सा | गू | ती | ■ | ग | ज | ब | ज |
| रा | न | ■ | मा | न | वी | ■ | न |
| ■ | ■ | गु | ■ | भ | ज | न | ■ |
| स | मा | म | ■ | रा | ■ | ख | स |
| त | ■ | ■ | भ | री | त | ■ | मा |
| ल | ग | ब | ग | ■ | वा | ट | प |
| ज | ळ | ■ | र | क्षा | ■ | का | न |

**आडवे शब्द :–** १) षड्रिपूंपैकी एक; मीपणा; गर्व ५) मार्केट ; हाट; मंडई ८) खूप; पुष्कळ; रगड ९) डोळ्यातील बुबुळावर येणारा कवडा १०) हात; हस्त; टॅक्स; सारा ११) हंस १३) एक क्षुद्र कीटक; मच्छर १५) एकसारखे निरर्थक बोलणे; बडबड १९) एक शाकाहारी जंगली प्राणी २१) ढीग; चळत; चवड २२) तोरा; कीर्ती; ताण २३) फरक; तफावत २४) आईची बहीण २५) शंकर; महादेव २६) मागे असलेले मोठे खटले २७) इंग्रजी वर्षाचा पाचवा महिना

**उभे शब्द :–** १) फलाणा; २) गायीचे ओरडणे ३) आजच्या आदला दिवस ४) विशिष्ट द्रव्यसंख्या; अमाउंट ५) दिसण्यात वेडसर; गबाळा ६) लड्डु; आडव्या अंगाचा ७) गोडी; चव; स्वाद १२) लंकेचा दहातोंडी राजा १४) सहन करणारा; सोशीक १६) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक १७) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १८) अंदाज; अनुमान; तर्क; कयास २०) एक प्रवासी वाहन २३) आकाश; नभ; गगन २५) भोळा मनुष्य; शंकर, महादेव

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : चांगल्या पुस्तकाविना घर म्हणजे दुसरे स्मशानच होय. – **स्वामी विवेकानंद.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### दूषित पाण्यामुळे कोणते आजार होतात?

नळाचे पाणी कधी कधी खूपच खराब दिसते. गढूळ पाणी पिण्यास अयोग्य असते, हे कोणीही सांगेल; पण वरून स्वच्छ दिसणारे पाणीही पिण्यास योग्य असेलच असे नाही. साध्या डोळ्यांनी न दिसणारे असंख्य जिवाणू व विषाणू तसेच परजीवी त्यात असू शकतात. काही रासायनिक पदार्थ असल्यामुळे किंवा किरणोत्सर्गी पदार्थांमुळेही पाणी दूषित होऊ शकते. रासायनिक पदार्थ कोणता आहे, यावर रोगाची लक्षणे अवलंबून राहतील. पाण्यात जिवाणू असतील तर ते पाणी पिण्याने टायफॉईड, कॉलरा, हगवण असे रोग होऊ शकतात. विषाणूंमुळे कावीळ, पोलिओ यांसारखे रोग होतात. परजीवी जंतूंमुळे अमिबा व जिआर्डीया यांची लागण होते. गोल कृमी, अंकुश कृमी, तंतू कृमी इत्यादींची लागण त्या जंतूंची अंडी पाण्यात असतील तर होते. पाण्यात सायक्लोप्स नावाचे किटक असल्यास नारू हा रोग होऊ शकेल, तर गोगलगायीमुळे शिस्टोसोमीयासीस हा रोग होईल. दूषित पाण्यामुळे असे अनेक रोग होतात. नुसते पाहून पाणी चांगले की वाईट ते कळत नाही. त्यामुळे पिण्याच्या आधी ते शुद्ध आहे याची खात्री करून घ्यावी हेच चांगले. पाण्यात तुरटी फिरवणे, गाळणे, उकळून गार करणे या उपायांनी जंतूंचा नाश होतो. क्लोरीनच्या गोळ्या वा द्रावण वापरून सुद्धा पाणी शुद्ध करता येते. ही पाण्याच्या शुद्धिकरणाची स्वस्त व परिणामकारक अशी पद्धत आहे. पाण्याच्या बाबतीत 'दिसते तसे नसते, म्हणून जग त्याला फसते' ही म्हण अगदी सार्थ ठरते. परंतु योग्य ती काळजी घेतल्यास प्रदूषित पाण्यापासून होणाऱ्या रोगांना आपण सहजपणे प्रतिबंध करू शकतो.

## ओढवून घेतलेले संकट

दोन कोल्हे भक्ष्य शोधत फिरत असता एके ठिकाणी त्यांना कोंबड्याचे मोठे खुराडे दिसले. युक्ती करुन त्यांनी खुराड्यात प्रवेश केला आणि कोंबड्या मारुन खाण्याचा सपाटा लावला.

त्या दोन कोल्ह्यांपैकी तरुण कोल्हा अविचारी होता. तो म्हणाला, ''आजच सर्व कोंबड्यांचा फडशा पाडावा, तर दुसरा म्हातारा कोल्हा अनुभवी असल्याने म्हणाला, ''अरे एकदम खाण्यापेक्षा दुसऱ्या दिवशी खाण्यासाठी काही कोंबड्या राखून ठेवाव्यात. माझा असा अनुभव आहे की, या जगात कितीतरी अतर्क्य गोष्टी घडलेल्या आहेत. तेव्हा सर्व खाणे एकदम न संपवता त्यातील काही राखून ठेवणे हे केव्हाही चांगले. तेव्हा तरूण कोल्हा म्हणाला, '' दादा, ''तू म्हणतोस ते खरे असले, तरी मला असे वाटते की, पुढच्या आठवडाभराचे एकदमच खाऊन घ्यावे. पुढचे काय सांगावे? उद्या या कोंबड्यांचा मालक इथे राखण करीत बसेल आणि उद्या आयतेच त्याच्या हाती सापडून जिवाला मुकू. तर अशा वेळी उद्या येथे येऊन जीव कशाला धोक्यात घालायचा? असे करणे म्हणजे मुर्खपणाच. त्यापेक्षा आताच संधी आहे, तोवर सर्व कोंबड्या खाऊन टाकणे बरे.''

असे म्हणत तो तरुण कोल्हा कोंबड्यांवर तुटून पडला. त्याने इतक्या कोंबड्या खाल्ल्या की त्याचे पोट टम्म फुगले आणि शेवटी पोट फुटून तरुण कोल्हा जागेवरच मरण पावला. म्हातारा कोल्हा दोन कोंबड्या खाऊन उद्या पुन्हा यावे, असे म्हणत निघून गेला. पुन्हा दुसऱ्या दिवशी कोंबड्या खाण्यासाठी म्हातारा कोल्हा तेथे आला असता कोंबड्याच्या मालकाच्या आयताच हाती लागला. मालकाने त्याला पकडून इतके बडवले, की तो जागच्या जागी ठार झाला.

**तात्पर्य** : तरुण लोक अविचाराने, तर म्हातारे लोक लोभामुळे संकटात सापडतात.

## जीवन चक्र



उत्तरेकडील हवा आणि सुर्य यांच्यामध्ये एकदा वाद झाला की अधिक शक्तिशाली आणि प्रभावशाली कोण आहे. उत्तरेकडील हवा म्हणाली की, मी अधिक बलवान आहे. आणि तेव्हा सुर्य देखील म्हणाला की मी अधिक बलवान आहे. दोघे एका स्पर्धेसाठी तयार झाले. त्यांनी ठरविले की जो कोणी एका माणसाच्या शरीरावरचा कोट उतरवेल तो जिंकेल. त्यांनी एका अशा माणसाला निवडले की जो एक लांब पदयात्रा करून घरी चालला होता. पहिले हवेची पाळी होती. हवा खुप जोरात वाहू लागली आणि प्रयत्न करू लागली की त्या माणसाचा कोट उतरवेल. ती अजून जोरात वाहू लागली. तितक्याच जोराने माणसाने आपल्या चारही बाजुने कोट पांघरून घेतला. हवेने माणसाचा कोट उतरवण्याचा खूप प्रयत्न केला पण त्यातून हवेला सफलता मिळाली नाही. आता सुर्याची पाळी होती. त्याने प्रेममयी गरम किरणे माणसाजवळ पोहचवण्यास सुरूवात केली. सुर्य आपली उष्णतासारखी पाठवू लागला. शेवटी माणसाला खूप गरम होवू लागले आणि त्याने आपला कोट उतरवला. सुर्य हसून हवेला म्हणाला जसे तुम्ही बघत आहात की माझ्या प्रेममयी गरम पध्दतीने कोट उतरवला पण तुमच्या शक्तीशाली पध्दतीचा त्याने सामना केला. ही पौराणिक कथा एक महत्त्वपुर्ण संदेश देत आहे की, प्रेम व कोमलता नेहमी बल प्रयोगावर विजय मिळवते. काही लोकांचा असा समज आहे की, जोर जबरदस्ती, कठोरतेने किंवा उणी दुणी काढून ते दुसऱ्यापेक्षा सर्वोत्तम कार्य करू शकतात. परंतु अशा प्रकारच्या व्यवहाराचे कोणी एक अर्धेच उत्तर देतो. आपल्याला असे वाटते की, दुसऱ्याकडून कोणतेही काम करून घेण्यासाठी त्यांच्याशी कठोरतेने आणि जोर जबरदस्तीने वागावे लागते. परंतु सत्यता त्यांच्या उलट आहे. प्रेमाने आणि कोमलतेने आपण दुसऱ्यांना राजी करू शकतो. जेव्हा लोकांशी मोठ्याने किंवा कठोरतेने बोलले जाते तेव्हा ते निरूत्साहीत होतात. तेव्हा ते गप्प होतात व तेथून निघून जाऊ इच्छितात. जेव्हा लोकांशी प्रेममयी आणि उत्साहवर्धक बोलले जाते आणि गोड बोलले जाते तेव्हा ते प्रयत्नपुर्वक जादा काम करतात. जीवनामध्ये गोडवा (मिठास) टाकल्याने संसार अधिक प्रेममय होतो. प्रेमाची उब टाकल्याने कामे अधिक सोपी होतात. जर आपण सुर्यासारखे बनून दुसऱ्यापर्यंत उत्साहवर्धक मधुर वचन आणि हास्य पोहचविले तर आपल्याला असे दिसते की आपण जे काही करू ते प्रभावशाली होईल. जोर जबरदस्ती अधिक काळ सफल होत नाही.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

पहले स्वयं को अनुभव करता हूँ कि मैं एक अति सूक्ष्म प्रकाशमय बिन्दूरूप आत्मा हूँ... । शान्त हूँ, पवित्र हूँ, शक्तिशाली हूँ...। फिर परमात्मा को बुद्धि रूपी नेत्र से देखते हुए उनकी शक्तियों को अपने अन्दर समाने का अनुभव करता हूँ...। परमात्मा से पवित्रता की, शक्तियों की किरणें मुझ में आ रही हैं... मेरे अन्दर की कमजोरियाँ और पाप नष्ट हो रहे हैं...। मैं आत्मा और ही प्रकाशित हो रहा हूँ...। कुछ समय यह अनुभव करने के बाद मैं आत्मा शरीर से बाहर निकलकर परमधाम में परमात्मा के पास जाकर उनकी सारी शक्तियों को अनुभव करते हुए उन्हीं शक्तियों को नीचे सृष्टि पर सकाश के रूप में प्रवाहित करता हूँ...। इससे प्रकृति के पाँचों तत्व, चन्द्र, तारे, ग्रह, नक्षत्र, जीव–जंतु, वृक्ष, वनस्पति सब चार्ज हो रहे हैं... ऐसा अनुभव करता हूँ। शान्ति, प्रेम, आनन्द से भरपूर हो रहे हैं...। ४ से ४.३० बजे तक इसी प्रकार योग करने के बाद मैं अपनी खेती को इमर्ज कर योगदान देता हूँ ५ मिनट तक। उसके बाद फसल को भी ५ मिनट तक एकाग्र होकर योगदान देता हूँ। इस तरह से प्रतिदिन योग के प्रयोग से प्रकृति के तत्वों का बहुत अच्छा सहयोग मिलता है और फसल निरोगी, शक्तिशाली होकर बढ़ती है।

जब भी मैं अपने खेत में पहुँचता हूँ तो पहले ५ मिनट योग करता हूँ, स्वयं को निमित्त समझकर परमात्मा की खेती में कर्म करने के लिए परमात्मा से प्रेरणा लेता हूँ, फिर कर्म करना आरम्भ करता हूँ। इस विधि से कई बार खेती में कितनी भी समस्यायें आती हैं फिर भी कभी मन हताश उदास नहीं होता है। हर मुसीबत नया उमंग बढ़ाने में मदद करती है। किसी प्रकार का भय नहीं रहता है क्योंकि हम परमात्मा के आदेश अनुसार कर्म करते हैं तो जिम्मेवार भी वही है। खर्चे की तो बात ही नहीं क्योंकि मैंने एक देशी गाय को पाला है, उसका जो भी गोमूत्र, गोबर मिलता है उससे ही ३ एकड़ खेती के लिये खाद और दवाई बनाने में उपयोग करता हूँ। खेती के चारों ओर आवश्यक वृक्षारोपण किया है, उसी से दवाई बनती है। खेती में ही एक कुटिया बनाई है, जब भी समय मिलें उसमें बैठकर योग करता हूँ। अब मुझे दुनियावी बातों में ज्यादा ध्यान देने की जरूरत नहीं है क्योंकि स्वयं भगवान मेरे मार्गदर्शक बने हैं। जो भी किसान आते हैं, पूछते हैं तो उनको समझाता हूँ कि कैसे खेती में आध्यात्मिकता का महत्व है। अपने विचार शुद्ध होते हैं तो खेती में भी कीट नहीं आते। मुझमें अगर कोई अवगुण नहीं तो मेरी फसल में भी कोई बीमारी नहीं आयेगी। जब अपने अन्दर बुराइयाँ वा कोई व्यसन हैं तो खेती में भी जरूर होंगी, इसलिए राजयोग के अभ्यास से जो भी आध्यात्मिक शक्तियाँ मिलती हैं वे सभी समस्याओं के लिये समाधान स्वरूप में एक दवाई का काम करती हैं।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

'पांडोबाला साप चावला.'
'मग?'
'त्याच्या मित्रांनी त्याला दोन बाटल्या दारू पाजली.'
'उतरलं का पांडोबाचं विष?'
छे!... छे!... विष उतरलं नाही...
पण सुखात मेला.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

त्याला सूर्याचा प्रकाश आवडतो
त्याला आईच्या चेहऱ्यावरील
वात्सल्य दृष्टी आवडते



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

चिकित्सा मधुना किण्वचूर्णं वा दद्यात् अचरणापहम्।
स्त्रोतसां शोधनं कण्डूक्लेदशोफहरं च तत्।।
(चरक चिकित्सा ३०–१०२ ते १०४)

शतावरी, जेष्ठमध, भुईकोहळा, अश्वगंधा यांनी सिद्ध केलेल्या तेलापासून योनीमध्ये उत्तर बस्ती द्यावी. किण्व आणि कुटकीचे चूर्ण मधामध्ये मिसळून त्याचा पिचू योनीमध्ये धारण करावा. यामुळे सर्व शरीरातील स्त्रोतसांचे शुद्धीकरण होते. सूज व खाज नाहीशी होते. परंतु हे सर्व उपचार डॉक्टरांच्या सल्ल्याने करावेत.

**क) उपप्लुता योनी व्यापत् :**

स्त्रीने व गर्भवतीने जर कफकर आहाराचे सेवन जास्त काळ केले तर कफाचा प्रकोप होऊन संचित झालेला कफ योनिमार्गातून बाहेर पडतो. त्यामुळे कफसदृश श्वेतरंगाचा स्राव योनिमार्गातून वाहू लागतो. यालाच श्वेतप्रदर असे म्हणतात.

**चिकित्सा :** उपप्लुता योनी व्यापत्मध्ये श्वेतस्राव जास्त प्रमाणात असतो. आवळा रोगप्रतिकार शक्ती वाढवत असल्यामुळे आवळ्याचा कल्क साखर व मध घालून पाण्यासोबत घ्यावा किंवा आवळाच्या चूर्णाचे मधाबरोबर चाटण द्यावे. योनिमार्गातील स्राव चिकट असल्याकारणाने त्रिफळा, तुरटी, लाजाळू, आंब्याच्या कोयीतील मज्जा, धायटी यांचे चूर्ण मधात मिसळून लावले असता योनी स्वच्छ होते. वरील उपचारांनी श्वेतस्राव नष्ट होतो. त्यानंतर वाताचे शमन करण्यासाठी अचरणा योनी व्यापत् चिकित्सेतील जीवनीय औषधांनी सिद्ध केलेल्या तेलांची योनिमार्गात उत्तर बस्ती द्यावी. वरील सर्व श्वेतप्रदरावरील उपचार आयुर्वेदीय डॉक्टरांच्या सल्ल्याने करावेत.

**रुग्णानुभव १४ :**

एक ३० वर्षांची महिला श्वेतप्रदराचा त्रास होत होता म्हणून उपचाराकरिता आली होती. सर्व प्रकारचे ॲलोपॅथिक उपचार करूनही तिला फरक पडत नव्हता. मला म्हणाली, 'मॅडम, मला रोजच अंगावरून सफेद जाते. त्यामुळे माझी कंबर फार दुखते. थोड्याशा कामाने देखील मला थकल्यासारखे होते. योनिभागी ओलसरपणा राहत असल्यामुळे मला कायमच जंतुनाशक मलम लावावा लागतो. मलम नाही लावला तर अचानक कधीही खाज येते. मला याचा कंटाळा आला आहे. अजून किती दिवस मी मलम लावणार? मी तिची तपासणी केली. तिच्या गर्भाशयमुखावर एक छोटी जखम होती. त्या जखमेतून स्राव बाहेर येत होता. जखमेमुळे गर्भाशय व योनिमार्गावर सूज आली होती. तपासणी केल्यानंतर मी तिला विचारले, तुझ्या अंगामध्ये बारीक ताप नेहमी असतो का? तुझ्या पतींनाही काही त्रास होतो का? शारीरिक संबंधांच्या वेळी काही त्रास जाणवतो का? (क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००



शिक्षिका तथा कवयित्री विद्या भडके लिखित 'अनमोल भेट' या कथासंग्रहाचे प्रकाशन काव्य संमेलनात पार पडले, त्यावेळी राजेंद्रबापू जाधव, चंद्रकांत बनसोडे, पोनि. प्रदीप देशमुख आदी.

## कवियत्री विद्या भडके यांच्या अनमोल भेट कथासंग्रहाचे प्रकाशन

नगर – येथील शिक्षिका तथा कवियत्री विद्या भडके लिखित अनमोल भेट या कथासंग्रहाचे प्रकाशन काव्य संमेलनात पार पडले. माऊली प्रतिष्ठान संचलित नाते शब्दांचे साहित्य मंचच्या वतीने कोपरगावच्या बालाजीनगर येथील ब्राह्मण सभा हॉलमध्ये झालेल्या चौथे राज्यस्तरीय काव्य संमेलनात या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले.

या कार्यक्रमासाठी संमेलनाचे उद्घाटक तथा महानंदा दूध उत्पादक संघाचे माजी उपाध्यक्ष राजेंद्रबापू जाधव, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे, कोपरगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, विजय जाधव, ज्येष्ठ साहित्यिका वनमाला पाटील आदी उपस्थित होत्या.

विद्या भडके यांना अनमोल भेट हा कथासंग्रह लिहिण्यासाठी मिळालेली प्रेरणा, यात असलेला विषय आणि आशय त्याचबरोबर अनमोल भेटबाबतचा परिचय करुन दिला. हा कथासंग्रह नक्कीच सर्व वाचकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास भडके यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी ज्ञानेश्वर शिंदे, बाळासाहेब देवकर, चंदनताई तरवडे, डॉ. जी. के. ढमाले. नंदकिशोर लांडगे, पंडित निंबाळकर, कल्पना देशमुख, भावना गांधीले, दिनेश चव्हाण, अनिल धाडगे, गणेश धाडगे, साक्षी धाडगे यांच्यासह अनेक कवी व साहित्यिक उपस्थित होते.

## जिल्हा क्रीडा संकुलात २१ जूनला योग दिनाचे आयोजन

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिनानिमित्ताने २१ जुन रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत जिल्हा क्रीडा संकुल, बॅडमिंटन हॉल, वाडियापार्क अहमदनगर येथे सामुहिक योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी पांढऱ्या पोषाखामध्ये स्वतःचे आसन घेऊन सकाळी ६-३० वाजेपर्यंत नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

## सेवाप्रीतचा स्नेहमेळावा अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसह साजरा

### सामाजिक प्रकल्प राबविणाऱ्या ग्रुपच्या महिलांचा सन्मान; दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याने उपस्थित भारावले

नगर – गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी योगदान देणाऱ्या व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा स्नेह मेळावा स्नेहालय संचलित अनामप्रेमच्या अंध विद्यार्थ्यांसह पार पडला. या कार्यक्रमात विविध सामाजिक प्रकल्प राबविणाऱ्या ग्रुपच्या महिला लिडर व सदस्यांना सन्मानित करण्यात आले.



सेवाप्रीतचा स्नेहमेळावा अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसह साजरा करताना अजित माने, अनिता माने, जागृती ओबेराय, अर्चना खंडेलवाल, सविता चड्ढा, डॉ. सिमरन वधवा आदी.

अनामप्रेमचे अध्यक्ष अजित माने व अनिता माने यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्नेह मेळाव्याचे उद्घाटन झाले. यावेळी सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, सविता चड्ढा, डॉ. सिमरन वधवा, स्विटी पंजाबी, अन्नू थापर, रितू वधवा, गितांजली माळवदे, गीता नय्यर, निशा धुप्पड आदींसह महिला सदस्या उपस्थित होत्या.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, सर्व महिलांच्या एकत्रित सामाजिक योगदानाने सेवाप्रीत चालत आहे. परमेश्वर कोणाला कोणत्या रूपात केव्हा मिळेल? हे माहित नाही. पण प्रत्येक व्यक्तीत परमेश्वराचे रूप असून त्या परमेश्वराची सेवा सेवाप्रीत करत आहे. दिवा स्वतः जळून इतरांना प्रकाश देतो, त्याचप्रमाणे सेवाप्रीतच्या सदस्या स्वतःच्या प्रकाशाने इतरांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. चांगले कर्म करण्याची ईश्वराने जणू एक संधी उपलब्ध करून दिली आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन मुलांचे भविष्य सुधारून समाज घडविण्याचे कार्य सेवाप्रीतच्या महिला तन-मन धनाने करत असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिता माने म्हणाल्या की, गरजू घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना उभे करण्याचे अनामप्रेम प्रमाणेच सेवाप्रीत कार्य करत आहे. सेवाप्रीतच्या माध्यमातून सर्व घटकातील गरजू विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेली सामाजिक चळवळ दिशादर्शक आहे. अनामप्रेम दिव्यांग विद्यार्थ्यांना जीवनात उभे करण्याचे काम करत आहे. या मुलांना स्पर्धेत टिकण्यासाठी अद्यावत शिक्षण व विविध प्रकारचे कौशल्यक्षम प्रशिक्षण देऊन त्यांना घडविण्याचे कार्य केले जात आहे. दिव्यांगांचा सांभाळ, त्यांचे शिक्षण व व्यवसाय आणि नोकरीच्या माध्यमातून त्यांना आर्थिक सक्षम करुन लग्न लावून देण्याचे कामही केले जात असल्याचे स्पष्ट करुन अनामप्रेम प्रकल्पाची त्यांनी माहिती दिली.

गणेश वंदनाने कार्यक्रमाचे प्रारंभ झाले. अनामप्रेमच्या आर्केस्ट्रामधील कलाकारांनी विविध सुमधुर गीतांचा नजराणा पेश केला. उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात अंध विद्यार्थ्यांच्या कलेला दाद दिली. अंध विद्यार्थी स्मार्टफोनद्वारे वापरत असलेले सोशल मीडिया, इंटरनेट तर राहुल पेटारे या दिव्यांग विद्यार्थ्याने १३ वर्षाच्या सरावाने एका हाताने टाळी वाजवणे, तबला, ढोलकीचा आवाज काढण्याच्या कलांच्या सादरीकरणाने उपस्थितांना अवाक केले.

सेवाप्रीतच्या वतीने अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना पेन ड्राईव्हची भेट देण्यात आली. तर अर्चना पुगलिया यांनी अनामप्रेमसाठी २५ हजार रुपयाचा धनादेश दिला. दिव्यांगांना प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे माने दांम्पत्यांचा सेवाप्रीतच्या वतीने सन्मान करण्यात आला. महिलांसाठी यावेळी प्रश्नमंजुषा, बौध्दिक व मनोरंजनात्मक स्पर्धा पार पडल्या. यामधील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत महिलांना रोटरी ई क्लब ऑफ एम्पॉवरिंग युथच्या वतीने रोपांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सिमरन वधवा यांनी केले.

# वैदुवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

### गरजूंच्या शिक्षणासाठी प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपचा पुढाकार

नगर - प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने सावेडी, वैदुवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रुपच्या सदस्या माया राजहंस व लता डेंगळे यांनी पुढाकार घेऊन मुलांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले.

माजी नगरसेवक मनोज दुल्लम व माजी नगरसेविका सोनाबाई तायगा शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी नम्रता दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, सावेडी प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा कुसुम सिंग, उपाध्यक्ष कविता दरंदले, प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, उषा सोनी, मायाताई कोल्हे, वंदना गोसावी, सुरेखा बारस्कर, शोभाताई भालसिंग, सुजाता पुजारी, मुख्याध्यापक नंदकुमार खंडागळे, मुख्याध्यापिका मीनाक्षी जाधव, माया राजहंस, रजनी भंडारी, लीला अग्रवाल, जीवनलता पोखरणा, हिरा शहापुरे, जयश्री पुरोहित, नागेश शिंदे, सुरेखा लोखंडे आदींसह महिला, विद्यार्थी उपस्थित होते.




प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्यावतीने सावेडीच्या वैदुवाडी येथील जि.प. प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना मनोज दुलम, सोनाताई शिंदे, जयाताई गायकवाड, कुसुम सिंग, अलकाताई मुंदडा.

मनोज दुल्लम म्हणाले की, गरजू घटकातील मुले शिक्षणाच्या प्रवाहात टिकण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने राबविण्यात आलेला उपक्रम दिशादर्शक आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. या उपक्रमातून भावी सक्षम पिढी घडणार असून, मुलांच्या जीवनात शिक्षण घेण्याची उमेद निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जयाताई गायकवाड म्हणाल्या की, प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून योगदान द्यावे. ग्रुपच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासह विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. गरजू घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन त्यांना आधार देण्याचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लता डेंगळे यांनी अभिजीत डेंगळे या विद्यार्थ्याच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील ३४ वर्षापासून दरवर्षी डेंगळे परिवाराच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत दिली जात असल्याची माहिती दिली. नवीन वह्या व गरजेचे विविध शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण झाला होता.

## प्रदूषण टाळायचे असेल तर नागरिकांनी देखील सायकलकडे वळावे

### आ.संग्राम जगताप



बुरुडगाव येथे जय मातादी ग्रुपच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना १५० सायकलींचे वाटप करताना आ. संग्राम जगताप. समवेत नवनाथ वाघ आदी. (छाया – लहू दळवी)

### बुरुडगाव येथे जय मातादी ग्रुपच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना दीडशे सायकलचे वाटप

नगर – विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी जय मातादी ग्रुपने समाजाला दिशा देणारा उपक्रम हाती घेतला आहे, बुरुडगावातील विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी सर्वसामान्य कुटुंबातील दीडशे विद्यार्थ्यांना मोफत सायकल देण्यात आले आहे. त्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या वाड्यावस्त्यावरील घरापासून थेट शाळेपर्यंत पोहोचला जाईल पुढची पिढी घडवायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही त्या माध्यमातून देश पुढे जाईल शासन दरबारी पाठपुरावा करून विकासाची कामे थेट जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे, सायकल वाटप हा उपक्रम प्रेरणा देणारा असून यासाठी युवकांनी पुढे येऊन समाजाप्रती सामाजिक उपक्रम राबवावे, प्रदूषण टाळायचे असेल तर नागरिकांनी देखील सायकलकडे वळावे, बुरुडगाव मधील युवकांनी एकत्रित येत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गावात उभा केला असून त्याचे सुशुभिकरणाचे काम पूर्ण झाले आहे, माझे गाव व माझ्या गावातील विद्यार्थी यांचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी जय मातादी ग्रुपने सायकल वाटपाचा हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

बुरुडगाव येथील दीडशे शालेय विद्यार्थ्यांना जय मातादी ग्रुपच्या वतीने मोफत सायकलचे वाटप आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जय मातादी ग्रुपचे अध्यक्ष नवनाथ वाघ, संकेत कुलट, विशाल पवार, सुभाष कुलट, विलास वाघ, जालिंदर कुलट, राधाकिसन कुलट, किशोर कुलट, रवींद्र ढमढेरे, खंडू काळे, महेश निमसे, दिनेश शेळके, सोमनाथ तांबे, बाळासाहेब जाधव, राहुल दरंदले, महेंद्र हिंगे, मंगेश झिने, दिलीप बोटे, गोरक्षनाथ कराळे, जब्बार शेख, कुंडलिक मोडवे, शनी तांबे, कलीम शेख, दत्ता कर्डिले, अमित जाधव, सचिन पाचारणे, विशाल कांबळे, गणेश मोडवे, नंदू शिंदे, अंकुश कुलट, विकास मोडवे, संजय मोडवे, भाऊ ससाने, उमेश कुलट, हरिभाऊ जाधव, पिनू पाचारणे, राजू फुलारी, राहुल चव्हाण, प्रसाद तांबे, सुभाष कुलट आदी उपस्थित होते.

जालिंदर कुलट म्हणाले की, जय मातादी ग्रुपचे संचालक नवनाथ वाघ व संकेत कुलट यांनी सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांचे सायकलचे स्वप्न पूर्ण केले आहे त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व हास्य पाहून मनाला समाधान झाले आ. संग्राम जगताप यांनी रस्ते, पाणी, लाईट, स्वच्छता, आरोग्य व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रश्न मार्गी लागावे यासाठी बुरुडगावात काम केले आहे बुरुडगावच्या सामाजिक कामाचा आदर्श नगर शहरातील कार्यकर्त्यांनी घ्यावा व गरजू कुटुंबातील व्यक्तींना सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून मदत करावी असे ते म्हणाले. प्रास्ताविक मंगेश झिने यांनी केले तर सूत्रसंचालन महेंद्र हिंगे यांनी आणि आभार प्रदर्शन नवनाथ वाघ यांनी मानले.



सेंट विवेकानंद इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे शाळेत शिक्षक स्वागत करून शुभेच्छा देताना. समवेत विद्यार्थी-विद्यार्थिनी.

## सेंट विवेकानंद स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात झाली आहे. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे शाळेत शिक्षकांनी स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी स्वागतगीत सादर केले. शिक्षकांनी आपापले वर्ग सजावट करून वातावरण प्रसन्नमय केले. उपप्राचार्या कांचन पापडेजा यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिक्षकांची ओळख करून दिली. शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलला होता. दीर्घ सुटीनंतर मित्र मैत्रिणी भेटल्याने गप्पाटप्पा रंगल्या होत्या. मुलांना चिक्कीचा गोड खाऊ देण्यात आला.

स्वागत करताना प्राचार्या गीता तांबे म्हणाल्या, सर्व विद्यार्थी नवीन शैक्षणिक वर्षात आणखी चांगली कामगिरी करण्यास सज्ज झाले आहेत. शाळेचे आवार विद्यार्थ्यांनी पुन्हा गजबजल्याने वातावरण आनंदी झाले आहे. यावर्षी सुध्दा शाळेच्या परंपरेनुसार विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक एकत्रित प्रयत्न करतील.

संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सेक्रेटरी गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर मखिजा, ट्रस्टी सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरनानी, हरेश मध्यान यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूचिता सारडा यांनी केले.




## राम रहीम सामाजिक प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण

राम रहीम बहुदेशीय सामाजिक प्रतिष्ठानद्वारे पारनेर येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात वृक्ष लावून पर्यावरण संरक्षणाच्या प्रति उल्लेखनीय कार्य करण्यात आले. वृक्षारोपण व संवर्धन ही आता काळाची गरज भासू लागली आहे. जनमानसाने आपल्या परीने या मौल्याच्या कार्यात सहभागी होणे गरजेचे आहे. आपल्या घरी बाळाचे जन्म, लग्नाचा वाढदिवस, मुलाचा वाढदिवस अशा प्रसंगी एखादे रोपटे लावण्यास काहीच हरकत नाही. या उपाययोजना मुले नक्कीच वृक्ष संगोपनात चालना मिळेल, असे डॉ. सोमेश्वर गायकवाड म्हणाले. याप्रसंगी आनंद मेडिकल फाउंडेशनचे सचिव व नगरसेवक डॉ. सादिक राजे, सलीम राजे, राम रहीमचे अध्यक्ष मेजर रफिक शेख, सृष्टीमित्र परिवाराचे अध्यक्ष लतीफ राजे, विनोद गायकवाड, तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, राम तांबे, दत्ता उनवणे, नियाज राजे, संतोष सोबले, शिरीष शेलार, इम्रान शेख, रियाज राजे उपस्थित होते.

## गुरुवर्य कै.प्रा. बत्तिन पोट्यन्ना शिक्षकांचे प्रेरणास्थान

गुरुवर्य कै.प्रा. बत्तिन पोट्यन्ना यांचे नाव येताच त्यांची तेजस्वी मुद्रा, भारदस्त पोशाख घातलेली दिव्यमूर्ती डोळ्यासमोर उभी राहतेय साधा रुमाल फेटा, स्वच्छ उपरणे व धोतर, खादीचा सदरा आणि त्यावर लांब कोट. प्रा. बत्तिन साहेबांना मी पाहिले तो दिवस मला आठवतो. त्यांनी बीजारोपण केलेल्या नगरमधील पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या प्राथमिक विद्यालयाला भेट दिली. त्यावेळी मला त्यांच्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडले.

गुरुवर्य पोट्यन्ना यांचा जन्म २० जून १९८८ रोजी नगरमधील पापय्या गल्लीत झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे थोरले बंधू मेघन्ना यांनी गुरुवर्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय केली. लहानपणापासून कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या पोट्यन्नांनी आपल्या स्मरणशक्ति व चिकाटीच्या गुणावर शाळेतील प्राथमिक शिष्यवृत्ती व सोसायटी हायस्कूलमधील माध्यमिक शिष्यवृत्ती मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. घरची परिस्थिती बिकट असल्याने पुण्यातील धनिकांच्या कृपाछत्राखाली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे फर्ग्युसन कॉलेजमध्ये नादारी मिळवून बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले आणि केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर अखिल भारतात पद्मशाली समाजातील पहिले पदवीधर होण्याचा मान मिळवला. जिद्द आणि चिकाटी असेल तर प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची दारे खुलू शकतात हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले.



अनेक प्रकारच्या उच्च शिक्षणाच्या, उच्च पदाच्या संधी उपलब्ध असताना पूर्व संकल्पानुसार शिक्षकी पेशा पत्करला व नोकरी करत एस.टी.डी.सी. ही पदविका प्राप्त केली. जळगाव येथील विद्यालयात नोकरीस असताना तत्कालिन मुख्याध्यापक कै. नारायण बनहट्टी यांनी पोट्यन्ना यांचे चोख काम पाहून लॉग बुकात 'त्यांच्या कामावर पर्यवेक्षणाची आवश्यकता नाही' असा शेरा दिला. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आपुलकी, बंधूभाव, निर्भयता व स्वावलंबन गुणांची जोपासना केली. ऋषीतुल्य वर्तन ठेवणारे गुरुवर्य प्राचार्य पदावरून निवृत्त झाले.

आपल्या ध्येयधोरणाप्रमाणे ते स्वतः एकटेच शिक्षक झालेत असे नाही तर त्यांनी शेकटो ध्येयवादी शिक्षक तयार केले आणि ही ज्ञानगंगा अखंडपणे कार्यरत ठेवली.

शिक्षकी पेशात असताना पद्मशाली विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवेशाची दारे खुली राहून साक्षरता प्रसारासाठी १९२० मध्ये नगर येथे पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची स्थापना केली. या मंडळामार्फत सुरुवातीला पारितोषिक वितरण, वह्या, पुस्तके, पाट्या वाटप कार्यक्रम सुरू झाले. पुढे याच संस्थेच्या बालवाडी ते ज्युनियर कॉलेजपर्यंत शिक्षण देणारी श्री मार्कंडेय प्राथमिक-माध्यमिक विद्यालये अहमदनगर व श्रमिकनगर येथे कार्यरत आहेत.

गुरुवर्यांनी नगर येथे समाजातील कारभारी व समाजबांधवांच्या सभा घेऊन एकीचे महत्त्व पटवून दिले व जनतेतून निवडून दिलेल्या प्रतिनिधींची पद्मशाली पंचकमेटी ज्ञाती समाजाची निर्मिती झाली.

नगर येथे झालेल्या गुरुवर्य बत्तिन पोट्यन्ना जन्मशताब्दी समारंभास अखिल पद्मशाली समाजाचे मार्गदर्शक व आंध्रप्रदेशचे माजी मंत्री आचार्य कोंडा लक्ष्मण बापूजी समारंभाचे अध्यक्ष म्हणून १९८८ मध्ये उपस्थित होते. आपल्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले, 'गुरुवर्य बत्तिन पोट्यन्ना हे शैक्षणिक क्रांतीचे दीपस्तंभ होते. (He was a torch of Educational Revolution)

समाजसेवेचे व्रत घेतलेल्या या कर्मयोगीने ४५ वर्षांपूर्वी भविष्य निर्वाह निधीची संपूर्ण रु. २०,००० पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाला देणगी दिली. आज त्यांच्या नावाने प्रा. बत्तिन पोट्यन्ना प्राथमिक विद्यालय चालू आहे. तसेच प्राचार्य बत्तिन पोट्यन्ना सामाजिक शैक्षणिक मंडळ नावाचे नगरमध्ये प्रतिष्ठान असून, त्यामार्फत दरवर्षी शिक्षकदिन समारंभ, पदवी-पदविकाधारक विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ तसेच गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आदि उपक्रम घेतले जातात.

त्यांचे पुढील विचार समस्त समाजाला प्रेरणादायी ठरतील. 'जेव्हाचे तेव्हा, जेथले तेथे, जेवढे पाहिजे तेवढे, जसे पाहिजे तसे ज्याचे त्याने स्वतःची कामे समजून उमजून करावीत.'

अशा या थोर विभूतींच्या पावनस्मृतीस १३६ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**– प्रा. बाळकृष्ण सिद्दम**
अध्यक्ष, गुरुवर्य बत्तिन पोट्यन्ना
शैक्षणिक-सामाजिक मंडळ, अहमदनगर

# संत निरंकारी मिशनच्यावतीने २१ जूनला नगरसह देशभर आंतरराष्ट्रीय योग दिवस




नगर – संत निरंकारी मिशन मार्फत 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' निमित्ताने २१ जून रोजी संपूर्ण भारतवर्षातील संत निरंकारी मिशनच्या विविध शाखांमध्ये योग दिवसाचे उत्साहपूर्वक आयोजन करण्यात येणार आहे. मंडळाच्या अहमदनगर शाखेच्यावतीने सुद्धा सकाळी ७ ते ८ या वेळेत संत निरंकारी सत्संग भवन, मिस्कीन रोड, नगर येथे योग शिक्षक प्रा.बबनराव बारगल यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिन साजरा केला जाणार आहे.

संयुक्त राष्ट्र संघाकडून यावर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा विषय 'महिला सशक्तिकरणासाठी योग' असा देण्यात आला आहे; जी आज काळाची गरज आहे यात तिळमात्र शंका नाही. संत निरंकारी मिशनदेखील वेळोवेळी महिला सशक्तिकरणासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवत असून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने प्रयास करत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शिलाई व एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण केंद्र, ब्यूटीशियन कोर्स, टयूशन सेंटर इत्यादींचा समावेश आहे.

२०१५ पासूनच संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत 'योग दिवस' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे आहे. 'योग' ही एक अशी प्राचीन पद्धत आहे ज्याद्वारे आध्यात्मिक, शारीरिक, मानसिक आणि आत्मिक स्वास्थ्य संतुलित केले जाते. योगाच्या नियमित अभ्यासाने तनाव मुक्त जीवन जगता येते.

महिलांच्या सशक्तिकरणात योगाला विशेष महत्व आहे. वर्तमान काळात जिथे महिला गृहस्थ जीवनाबरोबरच विविध कार्यक्षेत्रांमध्ये आपले महत्वपूर्ण योगदान देत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या व्यस्त जीवनामध्ये योग ही एक आवश्यक बाब झाली आहे. ज्यायोगे त्यांना आपल्या सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पेलण्यासाठी ऊर्जा व सहायता प्राप्त होते.

तरी नगरमधील योगप्रेमिनी या योग दीन कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संत निरंकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षक आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नाने विद्यार्थी घडतो

## माई पानसंबळ यांचे प्रतिपादन


निर्मलनगर येथील डोके विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे जि.प. माजी सदस्या माई पानसंबळ, अंगणवाडी सेविका सुनिता काळभोर, मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे, भरत जगदाळे आदी. (छाया – विजय मते)

नगर – शाळेतून मिळालेले संस्कार हे जीवनात नेहमीच मार्गदर्शक असतात. शाळा ही आपल्या जीवनाला आकार देणारी संस्था आहे. आजचा विद्यार्थी ही भविष्यातील देशाचा नागरिक असल्याने तो सक्षम व सुदृढ असणे गरजेचे आहे. शासनाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध योजना राबवत आहेत. या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घेऊन आपली प्रगती साधली पाहिजे. शिक्षक आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नाने विद्यार्थी घडत असतो. आज विद्यार्थ्यांना मिळालेल्या पाठ्यपुस्तके व शालेय साहित्याचा उपयोग करुन चांगला अभ्यास करावा. विशेषत: मोबाईलचा उपयोग गरजेपुरताच करावा शाळे मधे लक्ष द्यावे शिक्षणासाठी मोबाईलचा वापर करावा असे प्रतिपादन जि. प.च्या माजी सदस्या माई पानसंबळ यांनी केले.

### डोके विद्यालयात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

निर्मलनगर येथील डोके विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे जि.प.माजी सदस्या माई पानसंबळ, अंगणवाडी सेविका सुनिता काळभोर, मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे, भरत जगदाळे आदी उपस्थित होते.

यावेळी अंगणवाडी सेविका सुनिता काळभोर म्हणाल्या, डोके विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी चांगले उपक्रम राबविले जात आहेत. सर्वसामान्य कुटूंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवत आहे.

यावेळी मुख्याध्यापिका रिबेक म्हणाल्या, संस्था चालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना सर्वोतोपरि सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनांचा लाभ या विद्यार्थ्यांना मिळवून दिला जात आहे. अभ्यासाबरोबरच इतर स्पर्धा, परिक्षांसाठीही विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यात येत असल्याने विद्यार्थीही यश संपादन करत आहेत. त्यामुळे शाळेच्या लौकिकात भर पडत आहे. आज विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्पदेऊन स्वागत केले आहे, त्याचबरोबर मोफत पाठ्यपुस्तके वाटप करुन वर्षभरातील उपक्रमातून विद्यार्थ्यांची प्रगती साधली जाईल, असे सांगितले.

सूत्रसंचालन मंदाकिनी पांडूळे यांनी केले तर आभार आशा धामणे यांनी मानले. यावेळी शिक्षक, पालक उपस्थित होते. नवीन पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदून गेले होते.

# 'इंटेरियर डिझायनिंग'मध्ये आकांक्षा गाडे व फॅशन डिझायनिंगमध्ये निकिता मासुरे प्रथम

## आय.एस.डी.टी.ची १००% यशाची परंपरा


आकांक्षा गाडे प्रीती कराळे निकिता मासुरे अमना पठाण

नगर – येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (आय..एस.डी.टी.) या संस्थेच्या इंटेरियर डिझायनिंग व फॅशन डिझायनिंग अभ्यासक्रमांचे वर्ष २०२३/२४ चे निकाल जाहीर झाले असून डिप्लोमा इन इंटेरियर डिझाईन मध्ये आकांक्षा गाडे हीने ८०.८१% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रिती कराळे हिने ७२.५५% गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. डिप्लोमा इन टेक्स्टाईल व फॅशन डिझायनिंग मध्ये निकिता मासुरे हीने ८३.७९% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक तर अमना पठाण हिने ८२.४०% गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विनायक देशमुख यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख यांनी सांगितले, २००४ साली स्थापन झालेल्या आय.एस.डी.टी. या संस्थेने २० वर्षे पूर्ण केले असून यावर्षी संस्था २१व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यावर्षी देखील संस्थेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून फॅशन डिझायनिंग व इंटरियर डिझाईन या क्षेत्रातील आपले वेगळेपण पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

आतापर्यंत ३००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. आय.एस.डी.टी. च्या या यशामध्ये संस्थेचे प्राचार्य आर्कि. अरुण गावडे, महेश बालटे, शिरिष गावडे, प्रणव भोसले, पूजा पतंगे, मेधा आसणे, स्मिता बडाख, कोमल बिडकर, सानिका बार्शीकर, पूजा धट, रोहन चारगुंडी यांचा मोठा वाटा असून विद्यार्थी आणि पालकांच्या सहकार्यामुळेच हे यश प्राप्त करणे शक्य झाले आहे. असे पुजा देशमुख यांनी सांगितले.

फॅशन डिझायनिंग व इंटेरियर डिझायनिंग या क्षेत्रातील पदविका अभ्यासक्रम चालविणारी व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई यांच्याशी संलग्न असणारी आय.एस.डी.टी. ही जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे. संस्थेने अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर शासनाच्या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे.

२०२४/२५ या शैक्षणिक वर्षासाठी डिप्लोमा इन टेक्स्टाईल व फॅशन डिझायनिंग, डिप्लोमा इन इंटेरियर डिझायनिंग या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सध्या सुरू असुन दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना बजाज फायनान्स मार्फत शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. प्रवेशासाठी आय. एस.डी.टी., निर्मल चेंबर्स मागे, हार्मो केअर लॅब समोर, लालटाकी, अहमदनगर, (०२४१ २४३००२३) येथे संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य आर्किटेक्ट अरुण गावडे यांनी केले आहे.


एमआयडीसीतील रॉयल टेक्नॉलॉजीज्चा ११ वा वर्धापन दिन साजरा करताना कंपनीचे एमडी अजित भांडे, सौ. निर्मला भांडे. समवेत कंपनीतील कर्मचारी व त्यांचे कुटूंबीय.

# रॉयल टेक्नॉलॉजीज्चा ११ वा वर्धापन दिन साजरा

नगर– एमआयडीसीमध्ये अल्पावधीतच नावाजलेली कंपनी, रॉयल टेक्नॉलॉजीज् चा ११ वा वर्धापन दिन हॉटेल सिंग रेसिडेन्सी येथे पार पडला. सर्व कर्मचारी आपल्या कुटूंबासह कंपनीच्या सोहळ्यात सहभागी झाले होते. या वेळी कंपनीचे आधारस्तंभ आर.जी.भांडे सर, कंपनीचे एम डी अजित भांडे सर, सौ.निर्मला भांडे व सौ.श्वेता भांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आजपर्यंत कंपनीला जे यश मिळाले व जी काही प्रगती होत आहे त्याचे श्रेय स्वतःला न घेता सर्व कर्मचारी व टिमला देवून मनाचा मोठेपणा दाखवणारे अजित भांडे सर यांचे सर्वच उपस्थितांनी कौतुक केले.

या वेळी सर्व भांडे परीवार व संतोष घोगरे सर यांच्या हस्ते कंपनीतील गुणवंत कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला. उपस्थितांसाठि ऑर्केस्ट्रा म्युझीकल मोमेंटस् तर्फे हिंदी, मराठी गाण्यांची मैफल देखील आयोजित करण्यात आली होती.

नगरचे गायक सुनिल तेलतुंबडे (रोझ मॅन),राजू सावंत, सौ.पल्लवी बोरुडे व सौ. रंजना मेहेत्रे यांनी कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत आणली. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची महत्वाची जबाबदारी किरण तेलतुंबडे यांनी पार पाडली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजनाचे काम अमोल हळनोर व सचिन वाघ यांनी पाहिले. सर्व उपस्थितांचे सौ.अनिताताई घोगरे व सौ. सुषमा दहातोंडे यांनी आभार मानले.


शिवसेना नगरशहर विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे यांनी श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवसेना शाखा नेप्ती नाका चौक दातरंगे मळा नालेगाव येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी माजी नगरसेवक अर्जुन दातरंगे, उपशहरप्रमुख संदिप दातरंगे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, डॉ. श्रीकांत चेमटे, दत्ता दातरंगे, शुभम दातरंगे, सनी आगरकर, गणेश दातरंगे, दत्ता ठाणगे, सचिन धेंड, अविनाश लोंढे, अनिकेत उदारे, आशिष बंदरकर, सार्थक सुडके आदि.

# शिवसेना शाखांना ताकद देण्याचे काम वरिष्ठ पातळीवरुन करु

## विलास घोगरे यांचे प्रतिपादन; नगर शहर विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे यांची नेप्ती नाका शिवसेना शाखेस भेट

नगर – शिवसैनिक हा नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी पुढाकार घेत असतो. प्रत्येक भागातील शाखेच्या माध्यमातून शिवसेनेची खर्या अर्थाने बांधणी होऊन, संघटना मजबूत होत आहे. त्यामुळे अशा शाखांना ताकद देण्याचे काम वरिष्ठ पातळीवर करण्यात येत आहे. नगरमध्ये शिवसेनेचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे, अनेक शाखांच्या माध्यमातून संघटन सुरु आहे. नेप्ती नाका चौक येथील शिवसेना शाखेच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी चांगला पुढाकार घेत आहे, त्याचप्रमाणे विविध उपक्रमांतून नागरिकांना दिलासा देत आहेत. उपशहर प्रमुख संदिप दातरंगे यांनी युवकांचे चांगले संघटन निर्माण केले आहे. अशीच जनसेवा करत रहावी, असे आवाहन नगरशहर विधानसभा संपर्कप्रमुख विलास घोगरे केले.

शिवसेना ठाकरे गटाचे विधानसभा समन्वय संपर्कप्रमुख विलास घोगरे अहिल्यानगर येथे आले आस्ता त्यांनी श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवसेना शाखा नेप्ती नाका चौक दातरंगे मळा नालेगाव येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी माजी नगरसेवक अर्जुन दातरंगे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, उपशहरप्रमुख संदिप दातरंगे, डॉ श्रीकांत चेमटे, दत्ता दातरंगे, शुभम दातरंगे, सनी आगरकर, गणेश दातरंगे, दत्ता ठाणगे, सचिन धेंड, अविनाश लोंढे, अनिकेत उदारे, आशिष बंदरकर, सार्थक सुडके आदि उपस्थित होते.

याप्रसंगी संदिप दातरंगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवसेना शाखेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या व सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन विलास घोगरे यांचा सत्कार करण्यात आला.

# भिंगार हायस्कूलच्या सन १९७०–८० च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रंगला


अ.ए.सो.च्या भिंगार हायस्कूलच्या सन १९७९–८० बॅचच्या १० वीच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभागी झालेले विद्यार्थी–विद्यार्थिनी. समवेत तत्कालिन शिक्षक वर्गही उपस्थित होता.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भिंगार हायस्कूल भिंगार या शाळेच्या माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी सन १९७०–८० मार्च १९८० बॅचच्या जवळ जवळ ४५ वर्षांनी एकत्र येवून शाळेविषयी असलेले प्रेम, आपुलकी, शाळेविषयी असणारी आस्था, तळमळ दाखवून स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

हा स्नेहमेळावा १९ मे रोजी साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रथम एकत्र जमून शाळेमध्ये माजी प्राचार्य श्री. आव्हाड सर व माजी मुख्याध्यापक श्रीमती गायकवाड यांनी प्रथम सरस्वती पूजन केले.

मुख्याध्यापक श्रीमती गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकात काही मुद्दे मांडले तेही मनाला हुरहुर लावून गेले. तुम्ही जवळ जवळ ४५ वर्षांनी एकत्र येवून हा कार्यक्रम केला. त्यामुळे आम्हास फार आनंद झाला आहे. इतक्या वर्षांनी एकत्र न येता ६ महिन्यांनी किंवा १२ महिन्यांनी एकत्र या एकमेकांना फोन करा, भेटत जा. सहली काढा, कोणाचा फोन नाही आला तर आपणहून फोन करत जा व एकमेकांची खुशाली विचारत जा.

शाळेचे काम झाल्यावर तेथून आयरिस हॉटेलमध्ये प्रस्थान. तेथे गवांदे सर, श्रीमती गीते, श्रीमती धाडगे व श्रीमती धनराव यांचे स्वागत शंकर पतंगे, सुरेश जोशी, ईश्वर भंडारी, सदाशिव नागापुरे व राजश्री देशमुख, संगीता चिंचिने या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी केले.

नंतर गुरुजनांचे मनोगत झाले त्यामध्ये श्री. गवांदे सरांनी तुम्हाला पाहून मला खूप खूप आनंद झाला आहे. तसेच श्री. देशपांडे सरांनी मला तुम्हाला पाहून तो ४५ वर्षांचा मागील काळ आठवला व मन भरुन आले. फार फार आनंद झाला आहे.

तसेच श्रीमती गीते यांनी 'शाळेच्या बाई' ही कविता सांगून सर्वांची मने जिंकून घेतली. तसेच श्रीमती धाडगे यांनी ज्यांना आई–वडील आहेत त्यांची सेवा करा व आता मुला–बाळात न रमता आपल्यासाठी भारतभर प्रवास करा. प्रेक्षणीय स्थळे वगैरे पहा. माझे पाय दुखतात तरी मी पुर्ण भारतभर फिरते. त्यानंतर सौ. होनराव मॅडम यांचे भाषण झाले. त्यांनीही मला कार्यक्रमासाठी बोलवल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

दुपारच्या सत्रात सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचा परिचय करुन सध्या कोण कोण काय करतो याची थोडक्यात माहिती घेवून एक फॉर्म संजय गुगळे व शरद कंगे यांनी भरुन घेतला व त्यची स्मरणिका तयार करणार आहोत. भविष्यात ती सर्व मित्र–मैत्रिणींना कामी येईल.

अशा रितीने कार्यक्रमाचे नियोजन करुन सकाळी ९ ते ५ या वेळेत माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. नाष्टा, जेवण व दुपारी आईस्क्रीम नंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. असेच गेट टू गेदर पुन्हा व्हावे अशी सर्वांनी आपली ईच्छा व्यक्त केली.

# मुलांनी लग्न झाले तरी आई–वडिलांना वेगळे समजू नये

## खासेराव शितोळे यांचे प्रतिपादन; ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असेल तर विभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार करता येते


श्री नागेश्वर ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, थेरगाव (ता–कर्जत) येथे संघाच्या कार्यालयाचे उदघाटन प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

नगर – आपली संस्कृती भारतीय संस्कृती आहे मातृदेवो भव पितृ देवो भव ही आपली संस्कृती आहे आई–वडिलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपध्दत होती आणि आता विभक्त कुटुंबपध्दत आहे त्याचे अनेक दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागत आहेत त्यामुळे वृद्धाश्रमात वृद्धांचे प्रमाण वाढत चालले आहे ही एक शोकांतिका आहे.मुलांनी लग्न झाले तरी आपल्या आईवडिलांना वेगळे समजू नये. ज्येष्ठ नागरिकांना होत असेल तर विभागिय अधिकारी यांचेकडे तक्रार करता येते, असे प्रतिपादन महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अहमदनगर विभागाचे प्रादेशिक अध्यक्ष (फेस्कॉम) नेरुळ, मुंबई माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले.

खासेराव शितोळेसर यांच्या हस्ते श्री नागेश्वर ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, थेरगाव (ता. कर्जत) येथे कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रादेशिक विभाग अ.नगरचे अध्यक्ष सर्वोत्तम क्षिरसागर, कार्याध्यक्ष के. डी. खानदेशी, अशोक आगरकर, शिवाजीराव ससे, नूर आलम शेख, नांगरे, ऊदारे सरपंच मिनीनाथ शिंदें, नागेश्वर संघाचे अध्यक्ष रावसाहेब महानवर, नागेश्वर विद्यालयाचे संस्थापक जोगदंड सर, पै.अशोक सकट आजी माजी ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ज्येष्ठ नागरिक हजर होते.

पुढे बोलताना श्री शितोळे म्हणाले की आई वडील मुलांची अती काळजी करतात आणि घेतात त्यामुळे मुलांनीही आपली काळजी घेतली पाहिजे ही अपेक्षा असते. परंतु सद्य परिस्थिती ही वेगळी आहे. आई–वडिलांनी पण पूर्णपणे मुलांवर अवलंबून राहून मुले मोठी झाल्यावर आपले सर्व काही करतील, या आशेवर राहू नये असे यावेळी ते म्हणाले.

यावेळी कार्याध्यक्ष के. डी. खानदेशी यांनी ज्येष्ठ नागरिक संघ स्टेशन परिसराच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव डाडर, शब्बीरभाई पठाण यांनी मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयाचा दहावी परिक्षेचा निकाल ९५.३४ टक्के





नगर – ज्ञानसरिता विद्यालय वडगाव गुप्ता या शाळेचा मार्च २०२४ चा एस.एस. सी परिक्षेचा निकाल ९५.३४% लागला असून उत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण १३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १२४ विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांसह यश संपादन केले आहे.

कु. भक्ती सुखदेव पवार ९३.४० % गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली. द्वितीय क्रमांक कु. जमदाडे अनुष्का संदीप ९१.८० % तर चि. फैजान शाकीर पठाण ८९ % गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त ठरला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे कौतुक, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थाचालकांचे सहकार्य सर्वांचेच अभिनंदन प्रभारी मुख्याध्यापक संजय कानडे सरांनी केले. संस्थेचे अध्यक्ष जालिंदर पा. डोंगरे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. ज्ञानसरिता विद्या प्रसारक मंडळाचे सचिव लोकनियुक्त सरपंच विजय शेवाळे, माजी प्राचार्य प्रकाश डोंगरे सर, अशोक पा. डोंगरे, प्रकाश बबन डोंगरे, बाळासाहेब दशरथ डोंगरे, डॉ. बापू पवार, अशोक शेवाळे, भागीनाथ गव्हाणे यांनीही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

१) भक्ती सुखदेव पवार, प्रथम क्रमांक
२) अनुष्का संदीप जमदाडे, द्वितीय क्रमांक
३) फैजान शाकीर पठाण तृतीय क्रमांक.

# प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास ६ ऑगस्ट रोजी 'कामबंद' आंदोलन

## नगर परिषद व नगर पंचायत कर्मचाऱ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षणिक उपोषण



महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्यावतीने नगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसंदर्भात एक दिवशी लक्षणिक उपोषण करण्यात आले. याप्रसंगी सनी चव्हाण, उल्हासाबाई चक्रनारायण, विमलबाई चव्हाण, इंदुबाई सुरेश चव्हाण, नंदाबाई वडागळे, बाळू भोसले, विठ्ठल वैरागर, आकाश नन्नवरे आदि.

नगर – महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्यावतीने नगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात एक दिवशीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. याप्रसंगी सनी चव्हाण, उल्हासाबाई चक्रनारायण, विमलबाई चव्हाण, इंदुबाई सुरेश चव्हाण, नंदाबाई वडागळे, बाळू भोसले, विठ्ठल वैरागर, आकाश नन्नवरे आदि सहभागी झाले होते.

निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०/३/२०२३ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत राज्यातील सर्व नगर परिषदा, नगरपंचायतमधील प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव, वित्त सचिव, नगरविकास सचिव, सामाजिक न्याय विभाग सचिव आणि आयुक्त तथा संचालक नगर पालिका प्रशासन संचालनालय यांच्या उपस्थित घेतले होते. त्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी गेली २ वर्षे झालेली नसल्यामुळे राज्यातील नगर परिषद व नगर पंचायत कर्मचारी यांनी विविध प्रकारे एकदिवसीय आंदोलन १८ जून रोजी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले गेले आहे. तरी कर्मचाऱ्यांचा प्रश्न अंतिमत: निकाली निघाला नाही तर ६ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व नगर परिषदा व नगर पंचायतीमधील कामगार कर्मचार्यांनी कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या–सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे उपदान रजावेतन व इतर प्रलंबित देयके मिळावेत. स्वच्छता व आरोग्य निरिक्षक पदविकास उत्तीर्ण कर्मचाऱ्यांचे समावेशन व पदस्थापना करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत व्हावेत. त्यासाठी राखीव निधीची तरतूद करावी. २००० ते २००५ पर्यंतच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कायम करावे. पात्रतेनुसार कर्मचाऱ्यांची पदोन्नतीची संधी मिळावी. १२ वर्षे व २४ वर्षांची कालबद्ध पदोन्नतीचे प्रस्ताव मंजूर करावेत. मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरीत समावून घ्यावे. कर्मचाऱ्यांसाठी श्रमसाफल्य योजना, घरकुल योजनेची अंमलबजावणी व्हावी. अ व ब वर्गामध्ये पदोन्नत्ती देण्यात यावी. नगरपरिषदेमधील रिक्त पदांवर मनपातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात. सरकारी कर्मचाऱ्यांबाबत होणाऱ्या निर्णयात संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करावी. या प्रलंबित मागण्यांबाबत राज्य, विभाग, जिल्हा पातळीवर समिती गठीत करुन अनेक वर्षांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढावे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था केंद्र सरकार व राज्य सरकारच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे प्रभावीपणे काम करत आहेत. त्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा ६ ऑगस्टपासून राज्यातील नगरपंचायत व नगरपरिषदेचे कर्मचारी काम बंद आंदोलन करतील, असे सनी चव्हाण यांनी यावेळी सांगितले.



शहरातील बंद सिग्नल सुरु करण्यात यावेत, या मागणीचे निवेदन मनसे शहर उपाध्यक्ष किरण रोकडे यांनी मनपा उपायुक्त श्रीकांत पवार. याप्रसंगी संकेत पाळंदे, नितीन जायभाय, मोहित कुलकर्णी, समर्थ मुर्तडक, ओम जगताप, ऋषी सोनवणे, स्वप्निल वारे, योगेश तांदळे, प्रतीक कदम आदि.

# शहरातील बंद सिग्नल चालू करा अन्यथा तीव्र स्वरूपात आंदोलन

नगर – शहरातील बहुतांश चौकामधील सिग्नल बंद आहे. ते तातडीने सुरु करण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर उपाध्यक्ष किरण रोकडे यांनी मनपा उपायुक्त श्रीकांत पवार यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे दिला. याप्रसंगी संकेत पाळंदे, नितीन जायभाय, मोहित कुलकर्णी, समर्थ मुर्तडक, ओम जगताप, ऋषी सोनवणे, स्वप्निल वारे, योगेश तांदळे, प्रतीक कदम आदि उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नगर मधील सर्वच महत्त्वाचे रस्ते हे कायमच गर्दीने गजबजलेला असतात. अनेक चौकातील सिग्नल यंत्रणा बंद असल्यामुळे छोटे – मोठे अपघात होत आहेत. ज्या ठिकाणी सिग्नल बंद आहेत त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी नसतात. सिग्नल बंद असल्यामुळे वाहतुकीचे नियोजन व्यवस्थित होत नाही. अनेक अवजड वाहने वेगाने शहरातून जात असतात. भविष्यात महत्त्वाच्या चौकामध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होऊ शकतात त्यामुळे तेथील सिग्नल यंत्रणा लवकरात लवकर चालू करावी. सध्या शाळा–महाविद्यालय सुरु झाले असल्याने स्कूल बस व विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तरी सिग्नल यंत्रणा तातडीने सुरु न केल्यास मनसे शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आंदोलन करण्यात येईल असे किरण रोकडे यांनी सांगितले.

## आर्किटेक्ट तुषार भांबरे यांचे तबला विशारद पूर्ण



नगर – नुकत्याच घेण्यात आलेल्या अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या तबला वादन परिक्षेत तुषार भांबरे यांनी उत्तम यश संपादन केले. त्यांना शिवरंजन संगीतालयाचे विश्वासराव बळवंत जाधव यांचे अमूल्य मार्गदर्शन त्यांना लाभले. तसेच आदेश चव्हाण यांची साथ लाभली.

तुषार भांबरे यांना वडिल कै.दत्तात्रय श्रीपती भांबरे यांचे लहानपणी पासुन प्रोत्साहन होते. तसेच प्रशिक्षणात कुठलाही अडथळा येऊ नये, म्हणून त्यांनी प्रतिकुल परिस्थितीत हे यश संपादन केले.

## कृषी विद्यापीठात १०४ एकर क्षेत्रावर हिरव्या चाऱ्याची लागवड

### आवश्यकता असलेल्या पशुपालकांनी हिरवा चारा घेऊन जाण्याचे आवाहन

नगर – जिल्हयात दुष्काळसदृष्य परिस्थितीच्या अनुषंगाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील १०४ एकर क्षेत्रावर हिरव्या चाऱ्याची लागवड करण्यात आली होती. लागवड करण्यात आलेला हिरवा चारा कापणीच्या अवस्थेमध्ये असुन ज्या पशुपालकांना चाऱ्याची आवश्यकता असेल अशा पशुपालकांनी प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे), बियाणे विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्याशी संपर्क साधुन हिरव्या चाऱ्याची स्वत: कापणी करुन व प्रती टन १ हजार २०० रुपये रक्कम विद्यापीठाकडे जमा करुन चारा घेऊन जाण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

# युवकांनी नोकरी मागे न पळता स्वतःचा व्यवसाय केला पाहिजे

## अरुण जगताप यांचे प्रतिपादन; निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या चाँदबीबी महालाच्या पायथ्याशी भेटणार नेप्तीची मटकी भेळचा स्वाद

नगर – निसर्गाच्या सानिध्यात फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना नेप्ती ची भेळ ही या ठिकाणी उपलब्ध होणार असून नागरिक निश्चित या भेळचा आनंद घेतील व युवकांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्या स्वतःचा व्यवसाय केला पाहिजे असल्याची भावना माजी आमदार अरुण जगताप यांनी व्यक्त केली.



नगर – पाथर्डी रोड, चाँदबीबी महालाच्या पायथ्याशी नवीन झालेल्या हॉटेल जय भोले येथे नेप्तीची भेळ सेंटरचे फित कापून शुभारंभ करताना माजी आमदार अरुण जगताप व आ. संग्राम जगताप. समवेत अक्षय कर्डिले, हॉटेलचे संचालक कृष्णा बेरड पाटील, पै.ऋषिकेश खामकर आदी.

नगर – पाथर्डी रोड, चाँदबीबी महालाच्या पायथ्याशी नवीन झालेल्या हॉटेल जय भोले येथे नेप्तीची भेळ सेंटरचे शुभारंभ माजी आमदार अरुण जगताप व आ. संग्राम जगताप, अक्षय कर्डिले यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी जय भोले उद्योग समूहाचे संचालक सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड, पै.ऋषिकेश खामकर आदी उपस्थित होते.

जय भोले उद्योग समूहाचे संचालक व हॉटेल जय भोले चे मालक सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड, पै ऋषिकेश खामकर यांना शुभेच्छा देण्यात आले.

पाहुण्यांचे बेरड पाटील व खामकर पाटील परिवाराकडून सत्कार करून आभार मानण्यात आले.

## नगरमध्ये स्वरयज्ञ कार्यक्रमाचे २२ व २३ जून रोजी आयोजन

नगर – श्रुती संगीत निकेतन अ'नगर आणि संगीत विकास सभा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने स्वरयज्ञ २०२४ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पेमराज सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात २२ जून रोजी दुपारी ३ ते ८ या वेळेत आणि २३ जून रोजी सकाळी ८ ते १२:३० या वेळेत होईल.



पं.विकास कशाळकर आणि पं.गजाननबुवा जोशी

ज्येष्ठ गायक आणि गुरू पं.गजाननबुवा जोशी यांच्या पुण्यस्मरणार्थ ही शास्त्रीय संगीताची मैफल दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी साजरी होत असते. ज्येष्ठ गायक आणि गुरुवर्य पं.विकास कशाळकर आणि त्यांचे देश विदेशातील शिकणारे शिष्य या कार्यक्रमात आपली कला पेश करतात. यावर्षी होणाऱ्या स्वरयज्ञात समक्ष शिकणारे सुमारे १९ आणि ऑनलाईन पद्धतीने शिकणारे सुमारे १० कलाकार आपली कला सादर करतील.

सहभागी होणाऱ्या कलाकारांमध्ये सुभाष कीर्तने, अपर्णा बिवलकर, पूर्वी विंची, अंजली दाणी, शर्वरी पुरोहित, वैभव दवे, डॉ. शशांक लिमये, महेश राव, अंजली मालकर, परिमल कोल्हटकर, अभिषेक कुलकर्णी, हृषिकेश गांगुर्डे, मकरंद सरपोतदार, मृदुला अडावदकर, प्रवीण कासलीकर, मकरंद खरवंडीकर, शौनक कुलकर्णी, पवन श्रीकांत नाईक, समीर बिल्डीकर, सोनाली तांबे, नचिकेत रारावीकर, मानसी जोशी, संपदा भालेराव, गौरव चंदा, चेतन अनंत, आदित्य गायकी, आकाश गायकी, वीणा वाटवे आणि पं.विकास कशाळकर हे आपली कला सादर करतील.

या कलाकारांना प्रवीण कासलीकर, अंजली दाणी, कल्याण मुरकुटे, शिवानंद माळी, शेखर दरवडे, हृषिकेश सुरवसे, लिपीन दास, प्रसाद सुवर्णपाठकी आणि सुपर्ण प्रताप हे साथसंगत करणार आहेत. सूत्रसंचालन माणिक देव करतील. या प्रसंगी गुंजारव या संस्कृत त्रैमासिकाचे प्रकाशन होईल, त्याचप्रमाणे गांधर्व मंडळाच्या विविध संगीत परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल.

या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संगीत रसिक, संगीत शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर आणि संगीत विकास सभेचे अध्यक्ष डॉ.विकास कशाळकर यांनी केले आहे.

# जनसेवक या नात्याने खासदारकीचा वापर फक्त जनतेच्या कामासाठीच करू

### खा.निलेश लंके यांचे प्रतिपादन






रेणुकामाता मंदिरात आरती करून ग्रामस्थांच्यावतीने आयोजित सत्काराचा स्वीकार करताना खासदार निलेश लंके. (छाया – अमित मन्यार)

नगर – जनतेने मला जनसेवक म्हणून संधी दिली आहे. लोकसभेच्या महाराष्ट्राच्या या दोन जागेच्या निकालावर संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले होते एक बारामतीची आणि दुसरी अहमदनगर लोकसभेच्या या पठ्याची. या दोन्ही जागांवर उमेदवारांना पाडण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले परंतु जी निवडणूक जनतेने हातात घेतली तेथे जनतेचाच विजय होतो. अशा विजयाची इतिहास देखील नोंद ठेवत असतो आज जनतेने माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारास खासदार पदासाठी निवडून दिलेले आहे. ज्यांनी निवडणुकीत दगा दिला किंवा विरोधी पक्षात गेले विरोधी उमेदवारांबरोबर सांगड घातली किंवा निवडणुकीदरम्यान विरोधी उमेदवाराबरोबर शाब्दिक हेवेदेवे झाले हे सर्व मी निकालानंतर विसरून गेलो आहे. आता खासदारकीचा वापर फक्त जनसेवक या नात्याने जनतेच्या कामासाठीच केला जाईल असे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केडगाव मधील सर्वपक्षीय व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित विजयोत्सव सत्कार कार्यक्रम प्रसंगी केले

सुरुवातीस केडगावच्या रेणुका मातेचे मंदिरात आरती घेण्यात आली व दर्शनानंतर विजयोत्सव मिरवणूक केडगाव देवी मंदिर ते केडगाव वेसी पर्यंत काढण्यात आली त्यानंतर वेसीमध्ये विजयी सभा घेण्यात आली. या सभेसाठी शिवसेना शहर प्रमुख दिलीप सातपुते, भगवान फुलसौंदर, अभिषेक कळमकर, बाळासाहेब बोराटे, अमोल येवले, विजय पठारे, योगिराज गाडे, ओंकार ट्रेडर्सचे संजय गारुडकर, हर्षवर्धन कोतकर, वसंत शिंदे, संजय मुनोत, सोपानराव कारखिले, ओंकार सातपुते, संग्राम कोतकर, गौरव कार्ले, बबलू कोतकर, कार्तिक सातपुते, ओंकार गारुडकर, विठ्ठल महाराज कोतकर, अजय आजबे, रावसाहेब भाकरे महाराज, केडगाव जागरूक मंचाचे विशाल पाचारणे, शिवाजी डमाळे, पप्पू भाले, पै. अगंद महानवर, हाजी उस्मान मनियार, हुसेनभाई मंडपवाले, केडगाव पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते

अमोल येवले यांनी निवडणुकीपूर्वीचे किस्से सांगत केडगावमध्ये जी विकास कामे अडवून ठेवण्यात आली आहेत ती मी जातीने लक्ष देऊन खासदार निलेश लंकेंच्या सहकार्याने तडीस नेणार व केडगाव मध्ये विकासाची गंगा वाहणार असल्याचा दृढ विश्वास त्यांनी व्यक्त केला. केडगावसाठी आता आपणास स्व. अनिल राठोड नंतर पुन्हा एकदा हक्काचा माणूस जनतेने दिलेला मोबाईल खासदार आपल्याला मिळालेला आहे असे त्यांनी सांगितले

यावेळी दिलीप सातपुते, अभिषेक कळमकर, विजय पठारे, योगिराज गाडे, पेन्शनर्स असोसिएशनचे मनोज संग्राम कोतकर, हर्षवर्धन कोतकर, अजय आजबे, कार्तिक सातपुते, संजय मुनोत यांची देखील भाषणे झाली

कार्यक्रमाचे आयोजन केडगाव शिवसेना व अमोल येवले मित्र परिवाराच्यावतीने करण्यात आले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल महाराज कोतकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रावसाहेब भाकरे महाराजांनी केले.

### कार्यक्रमाच्या वेळी अचानकपणे वीज पुरवठा खंडित

कार्यक्रमाच्या वेळी अचानकपणे वीज पुरवठा खंडित करण्यात आला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित खासदार निलेश लंके यांना सांगितले की आम्हाला हे अपेक्षितच होते. ज्या ज्या वेळेस आम्ही कार्यक्रम घेतो त्यावेळेस लाईट घालवली जाते. तुमच्या प्रचारादरम्यान देखील असेच करण्यात आले होते. यावर खासदार निलेश लंके यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना फोन लावत याचा जाब विचारला मी ज्या ज्या वेळेस या ठिकाणी प्रभागात प्रचाराला गेलो त्या – त्या वेळेस आपण लाईट खंडित केली. आजही माझ्या जनतेने आयोजित केलेल्या विजयोत्सवात आपण कार्यक्रमांमध्ये कोणाच्या तरी दडपणाखाली येऊन विर्जन कालवत आपण पुन्हा वीज पुरवठा खंडित केला आहे. पाच मिनिटात लाईट आली नाही तर हा विजय उत्सव मी आपल्या कार्यालयात येऊन साजरा करेन असे म्हणत फोन कट केला. फोन कट करताच ताबडतोब खंडित वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला व परिसर प्रकाशीत होताच जनसेवकाच्या या विजय उत्साला पारावारच उरला नाही. टाळ्यांच्या गजरात नवनिर्वाचित खासदारांचे स्वागत केडगावकरांनी केले. खंडित वीज पुरवठ्याच्यादरम्यान सर्वांनी आपल्या मोबाईलच्या फ्लॅश लाईट ऑन केल्या.

# वासन टोयोटा शोरुमच्या श्रीगोंदा शाखेचे उद्घाटन

नगर – ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी वासन टोयोटा शोरुमच्या श्रीगोंदा शाखेचे उद्घाटन करण्यात आले. आढळगाव रोड येथे नव्याने झाल्या या शोरुममध्ये सर्वांना परवडेल अशा किंमतीत लॉन्च करण्यात आलेल्या एसयुव्ही श्रेणीतील ऑल न्यू टोयोटा अर्बन क्रूजर टायसरचे अनावरण करण्यात आले.

यावेळी श्रीगोंदा नगर पालिकेचे अध्यक्ष मनोहर पोटे, नगरसेवक नाना लोखंडे, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन नाना डांगरे, पारगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी जगताप, प्राध्यापक डी.एम. शिंदे, काष्टी सेवा सोसायटीचे चेअरमन कैलास तात्या पाचपुते, विश्वास भुजबळ, वासन टोयोटाचे जनक आहुजा, अनिश आहुजा, प्रविण जोशी, समीर पवार, सूर्यकांत खेतमाळीस, मयूर गुंजाळ आदींसह ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी वर्ग उपस्थित होते.

मनोहर पोटे म्हणाले की, शेतकरी वर्ग व ग्रामीण भागाचा विचार करुन किर्लोस्कर कंपनी वाहन उत्पादन करत आहे. सुरक्षितता, दणकटपणा व आकर्षक लुक मधील टोयोटाचे वाहन ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे. विक्री पश्चातही वासन टोयोटाच्या माध्यमातून उत्तम सेवा मिळत असून, मोठा ग्राहक वर्ग त्यांच्याशी जोडला गेला आहे.

श्रीगोंदा येथे झालेल्या नवीन शोरुमच्या माध्यमातून सर्व सुविधा तालुकास्तरावर उपलब्ध होणार आहे. यामुळे ग्राहकांना वारंवार नगर शहरात जाण्याची गरज भासणार नाही. तालुक्याची गरज ओळखून सुरु करण्यात आलेल्या सेवेचा सर्वांना लाभ मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनक आहुजा यांनी श्रीगोंदा तालुक्याचा शेतकरी वर्ग वासन टोयोटाशी जोडला गेलेला आहे. अनेकांकडे टोयोटाचे विविध वाहन असून, त्यांना शोरुमच्या सर्व सुविधा स्थानिक ठिकाणी मिळणार आहे. ग्राहक वर्गाचा विचार करुन नवीन शोरुम सुरु करण्यात आले असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन वासन टोयोटाच्या वतीने त्यांनी केले.



वासन टोयोटा शोरुमच्या श्रीगोंदा शाखेचे आढळगाव रोड येथे उद्घाटन व ऑल न्यू टोयोटा अर्बन क्रूझर टायसरचे अनावरणप्रसंगी मनपाचे अध्यक्ष मनोहर पोटे, नाना लोखंडे, नाना डांगरे, जनक आहुजा आदी.

